# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २६/०९/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २६/०९/२०१३ रोजी सभा सुचना क्र. १४ दि. २०/०९/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजु यशवंत भोईर | सभापती |
| २. | श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो | सदस्य |
| ३. | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. प्रमोद जयराम सामंत | सदस्य |
| ६. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७. | श्री. राजेश शंकर वेतोसकर | सदस्य |
| ८. | श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन | सदस्या |
| ९. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| १०. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ११. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| १२. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| १३. | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| १४. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. रमेश जैन | सदस्य |
| २. | श्री. संदिप मोहन पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

नमस्कार, सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत तसेच प्रशासकीय वर्ग, अधिकारी, कर्मचारी वर्ग यांचे स्वागत करतो. सचिव साहेबांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. २६/०९/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १४, दि. २०/०९/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ८७, दि. १५/०७/२०१३ व दि. २६/०७/२०१३ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, इतिवृत्तांताचा विषय पूढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा.

**नगरसचिव :-**

विषय तेवढा मागितला तर निर्देष देतात.

**रोहिदास पाटील :-**

असे नाही होत.

**प्रशांत दळवी :-**

अस होणार नाही. कस वगळला जाणार तसा ठराव करा.

**रोहिदास पाटील :-**

इतिवृत्तांत पेंडीग ठेवू शकतो ना.

**नगरसचिव :-**

७ तारखेच्या मिटींगमध्ये हे इतिवृत्तांत मंजूरीसाठी ठेवतो.

**मा. सभापती :-**

७ तारखेच्या मिटींगमध्ये इतिवृत्तांत घेण्यात येईल.

**(सदरचा विषय मा. सभापतींच्या आदेशाने पुढच्या मिटींगमध्ये घेण्याचे ठरले.)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८८, मा. महिला व बालकल्याण समिती अभ्यास दौऱ्याबाबत.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, हे कामकाज सुरु होण्याआधी आपल्या सभागृहाच अभिनंदन मला करायच आहे. आपण अंदाजपत्रक बनवते वेळी याच सभागृहाने चौपाटीवर धक्का विकसित करावा म्हणून ५० लाखाची तरतुद केली. याच सभागृहात आपल्याकडे जेव्हा धक्का दुरुस्तीचा प्रस्ताव आला तो साडे पसतीस लाखाला आपण सभापतींनी सर्व अधिकाऱ्यांनी त्याला एक मुखी मान्यता दिली. सभेत ज्या पध्दतीने त्याला मान्यता दिली त्याच पध्दतीने ते कामकाज करते वेळी आपले आयुक्त, सभापती, शहर अभियंता, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त विशेषतः गणपती विसर्जनादिवशी हरी भाऊंच वर्षानुवर्षाच सकाळ पासून ते संध्याकाळ पर्यंत रहाण उपस्थिती असते, ह्या सगळ्यांमुळे ह्या वर्षाचा ऐतिहासिक सोहळा म्हणजे दरवर्षी ५-७ मुर्ती खंडित व्हायच्या, हात तुटला, पाय तुटला अस व्हायच. नको त्या पध्दतीने ओढून न्यायला लागत होत्या. आपल्या २०-२५ माणसांना जखमा व्हायच्या. चिखला मधुन सगळ्यांनाच जायला लागत असे. मग ते महापौर असू द्या, सभापती असु द्या, उपमहापौर असु द्या, सगळ्यांनाच जायला लागत असे. पण, ह्या वर्षी हे काहीच झाल नाही. एक ही मुर्ती खंडीत झाली नाही. एक ही कर्मचाऱ्याच एक थेंब रक्त निघाल नाही. एकाही अधिकाऱ्याच्या पायाला चिखल लागला नाही. आणि गेल्या वर्षी तर सकाळी १० वाजेपर्यंत विसर्जन चालल होत. पण ह्यावर्षी रात्री ५.०० वा. अत्यंत शांततेत पार पडल. तर त्याबद्दल ह्या महापालिकेतले सभागृहातले सर्व पदाधिकारी अधिकारी या कामकाजात ज्यांनी डायरेक्ट-इनडायरेक्ट आपल मार्गदर्शन दिल. मग ते क्रेन कसे असावे काय असावे अस नकळत जे बोर्डावर नाही त्या सर्वांच आभार मानुन मी अभिनंदन करतो. ह्या चांगल्या कामासाठी कुठेही अडथळा नाही. खुप चांगल्या वतीने काम पार पाडल. त्याबद्दल ही सभा सगळ्यांच अभिनंदन करते असा मी ठराव मांडतो.

**शरद पाटील :-**

माझें अनुमोदन आहे.

**बर्नड डिमेलो :-**

उपरोक्त संदर्भिय मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या दि. १६/७/२०१३ रोजीच्या ठराव क्र.५ अन्वये महिला व बालकल्याण समितीने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये कोडाईकनॉल, मेंगलोर येथे अभ्यास दौरा आयोजीत करणेबाबत सुचित केलेले आहे. तरी सदरचा अभ्यास दौरा आयोजीत केल्यास महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांना उपयुक्त मार्गदर्शन होण्यास मदत होईल. तरी सन २०१३-१४ या वर्षात महिला व बालकल्याण समितीच्या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याणसाठी कार्यक्रम/प्रशिक्षण/शिबीरे/मेळावे या लेखाशिर्षाखाली ९५ लाख तरतुद आहे. कोडाईकनॉल, मेंगलोर या ठिकाणी अभ्यास दौऱ्याचे दि.२२/९/२०१३ ते दि.२८/९/२०१३ पर्यंत आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सदर प्रशिक्षणास महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या, अधिकारी व कर्मचारी असे एकुण ०९ व्यक्तींचा समावेश करण्याबाबत महिला व बालकल्याण समितीच्या सभापती श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो यांनी कळविलेले आहे. तरी मा. महिला व बालकल्याण समिती अभ्यास दौरा आयोजीत करणेबाबत दिलेल्या जाहिरातीनुसार दरपत्रके मागविण्यात आलेले होते. त्यापैकी तीन दरपत्रके प्राप्त झालेली असुन खालीलप्रमाणे तपशील आहे.

| अ.क्र. | ट्रॅव्हलर्स आणि टुर्स कंपनीचे नाव | प्रती व्यक्ती येणारा खर्च |
|---|---|---|
| १ | श्रीनिश ट्रॅव्हलर्स आणि टुर्स | ९३,०६९ X ९ = ८,३७,६२१ |
| २ | कॉसमॉस ट्रॅव्हलर्स आणि टुर्स | १,०५,३०९ X ९ = ९,४७,७८१ |
| ३ | जी.बी. टुर्स आणि ट्रॅव्हलर्स | ९५,९४९ X ९ = ८,६३,५४१ |

त्यापैकी श्रीनीश ट्रॅव्हल्स आणि टुर्स यांचे दर कमी आहेत. त्यानुसार ९३,०६९ X ९ = ८,३७,६२१ खर्च अपेक्षित आहे. तरी कमी दराचे श्रीनीश ट्रॅव्हल्स आणि टुर्स यांच्या दरपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची (ड) मधील प्रकरण ५(२)(२) अंतर्गत ही सभा मंजुरी देत आहे.

**अनिता पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, इसमे मेरी सुचना है। प्रकरण क्र. ८८ ने मा. महिला व बालकल्याण समितीच्या दि. १६/०७/२०१३ ठराव क्र. ५ ने महिला व बालकल्याण समितीने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये अभ्यास दौऱ्याचे आयोजन केलेले आहे. अभ्यास दौरा दि. २२/०९/२०१३ ते दि. २८/०९/२०१३ रोजी कोडाईकनॉल, मेंगलोर येथे गेलेले आहेत. या दौऱ्याकरीता अपेक्षित खर्च रु. ८,३७,६२१/- करिता मा. स्थायी समितीची मंजूरी मागीतलेली आहे.

नियमाप्रमाणे अभ्यास दौऱ्याच्या खर्चास प्रथम मंजूरी घेणे आवश्यक होते व त्यानंतर दौऱ्याचे आयोजन करणे योग्य ठरले असते. तरी अशाप्रकारचे नियमबाह्य व बेकायदेशीर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मी सुचना मांडत आहे.

**मा. सभापती :-**

सुचना है की, ठराव है?

**राजेंद्र जैन :-**

सुचना है। साहब आपका अधिकार है, यह नियमबाह्य काम हुआ है।

**बर्नड डिमेलो :-**

ठराव मांडा ना.

**शरद पाटील :-**

सुचना फेटाळा ना.

**राजेंद्र जैन :-**

सुचना किया है। सभापती साहब पर निर्भर है की, वह क्या करते है। नियमबाह्य प्रकार अनुशासन भंग हो रहा है। नियम विरुध्द काम हो रहा है। रितसर काम नही हो रहा है।

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, गेल्या मिटींगला पण हा विषय आला होता तेव्हा आपणच सांगितल रितसर विषय येऊ द्या. त्याच्यामुळे गेल्या मिटींगमध्ये झाल असत तर व्यवस्थित असत. महिला बाककल्याण समितीत आपल्या सर्व पक्षाच्या महिला आहेत. चांगल्या कार्यासाठी अभ्यास दौरा करुन आपल्या शहरामध्ये चांगले उपक्रम राबवत असतील. तर चांगल्या कामसाठी गेले. तर मला वाटत त्याला विरोध व्हायला नको.

**अनिता पाटील :-**

मा. सभापती साहेब, सगळ्याच पक्षाच्या महिला आहेत. ही सुचना मान्य गैर आहे.

**राजेंद्र जैन :-**

हमने विरोध नही किया है। लेकिन यह काम पहले भी हो सकता था। आपके जाने के लिए हम विरोध नहीं कर रहे है। हमने यह बोला की, जाना था तो पहले से मंजुरी क्यों नही ली?

**हेलन गोविंद :-**

डॉ. साहब यह महिला लोग मिटींग में बैठी थी, उन्होंने ही ठराया है ऐसा नही करने का महिला लोगो का भी काम रहता है।

**मा. सभापती :-**

मतदान घेण्यात येत आहे.

**राजेंद्र जैन :-**

यह मेरी सुचना है। मतदान के लिए मैंने बोला नही है। यह तथ्य है और तथ्य पर मतदान नहीं होता है।

**बर्नड डिमेलो :-**

ही ठरावात सुचना घेऊ नका. त्यांना ठराव मांडायचा असेल तर ठराव मांडू द्या.

**राजेंद्र जैन :-**

मैंने सुचना किया है। सुचना तथ्य पर आधारीत है।

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, ह्याच्यात प्रत्येक पक्षाच्या महिला त्या सहलीला गेल्या आहेत. शिक्षण दौऱ्याला गेल्या आहेत. तुम्ही चर्चा करा परत असा प्रकार घडता कामा नये. अस रुलिंग द्या तुम्ही.

**शरद पाटील :-**

मतदानाचा प्रश्न नाही.

**बर्नड डिमेलो :-**

ठराव मांडला आहे तो.

**शरद पाटील :-**

ती सुचना आहे. फेटाळुन टाका.

**बर्नड डिमेलो :-**

ठराव मांडला अस ते बोलले ना.

**शरद पाटील :-**

नाही. ती सुचना आहे.

**राजेंद्र जैन :-**

यह तथ्य है। और तथ्य पर निर्णय लेना आपका निर्भर है।

**नगरसचिव :-**

त्यांची जी सुचना आहे ती मी वाचून दाखवतो. प्रकरण क्र. ८८ ने मा. महिला व बालकल्याण समितीच्या दि. १६/०७/२०१३ ठराव क्र. ५ ने महिला व बालकल्याण समितीने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये अभ्यास दौऱ्याचे आयोजन केलेले आहे. अभ्यास दौरा दि. २२/०९/२०१३ ते दि. २८/०९/२०१३ रोजी कोडाईकनॉल, मेंगलोर येथे गेलेले आहेत. या दौऱ्याकरीता अपेक्षित खर्च रु. ८,३७,६२१/- करिता मा. स्थायी समितीची मंजूरी मागीतलेली आहे.

नियमाप्रमाणे अभ्यास दौऱ्याच्या खर्चास प्रथम मंजूरी घेणे आवश्यक होते व त्यानंतर दौऱ्याचे आयोजन करणे योग्य ठरले असते. तरी अशाप्रकारचे नियमबाह्य व बेकायदेशीर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मी सुचना मांडत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

ठरावाच झाला ना हा.

**शरद पाटील :-**

सुचना आहे. फेटाळुन टाका ना.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, माझ अस म्हणन आहे की, प्रत्येक विभागाच्या प्रत्येक पक्षाच्या महिला त्या शिक्षण दौऱ्याला गेल्या आहेत. माझ अस म्हणन होत ......................

**शरद पाटील :-**

दौऱ्याला विरोध नाही केला ज्या पध्दतीने ................

**प्रशांत दळवी :-**

माझ अस म्हणन आहे जो काही चुकीचा ठराव आला.

**राजेंद्र जैन :-**

यह काम आप चार दिन बाद कर सकते थे ना।

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, चुकीचा गोषवारा नंतर आला आणि अगोदर सभेला गेला. अस पुढे घडता कामा नये अशा प्रकारे रुलिंग द्या ना.

**शरद पाटील :-**

मा. सभापती महोदय, कोण गेल, कोण नाही गेल त्याला आम्ही विरोध केलेला नाही. दौऱ्याला विरोध नाही. फक्त ज्या पध्दतीने ..................

**राजेश वेतोसकर :-**

ठराव व्हायच्या अगोदर गेले. तर एवढी काळजी घ्या.

**प्रशांत दळवी :-**

अशी रुलिंग द्या ना.

**शरद पाटील :-**

विषय पटला वरच घ्यायचा असतो तो विषय.

**राजेंद्र जैन :-**

अगर आप यह बोलते है तो इसका मतलब यह हुआ की, आपको स्थायी समिती के सभापती को कोई भी कानुन को तोडने की परमिशन है। इसका अर्थ यह लगाया जाता है।

**शरद पाटील :-**

ठिक आहे. आमची त्याच्यात सुचना घ्या. अधिकाऱ्यांवर कारवाईच शब्द वगळून घ्या आणि अशी घटना परत घडू नये. त्या पध्दतीने आला पाहिजे असा विषय घेऊन टाका.

**बर्नड डिमेलो :-**

तुम्ही ठराव द्या नाहीतर सुचना मागे घ्या.

**शरद पाटील :-**

ठिक आहे. ठराव घ्या.

**प्रशांत दळवी :-**

बर्नड साहेब, त्यांनी म्हटंल ना की कारवाई करायचा उल्लेख केलेला आहे तो काढतात ना.

(सभागृहात गोंधळ)

**बर्नड डिमेलो :-**

आम्ही कारवाई बद्दल विरोध नाही करत एका बाजुला सर्व सदस्य जातात.

**शरद पाटील :-**

अधिकाऱ्यांवर कारवाई घ्या. ठराव मांडा.

**मा. सभापती :-**

सचिव साहेब मतदानाला घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८८ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिल्या ठरावाचे सुचक श्री. बर्नड डिमेलो, अनुमोदन श्रीम. अनिता पाटील. दुसऱ्या ठरावाचे सुचक डॉ. राजेंद्र जैन अनुमोदक शरद पाटील यांच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचा आहे. तर दुसरा ठराव हा मी मतदानाला टाकतो. प्रकरण क्र. ८८ ने मा. महिला व बालकल्याण समितीच्या दि. १६/०७/२०१३ ठराव क्र. ५ ने महिला व बालकल्याण समितीने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये अभ्यास दौऱ्याचे आयोजन केलेले आहे. अभ्यास दौरा दि. २२/०९/२०१३ ते दि. २८/०९/२०१३

रोजी कोडाईकनॉल, मेंगलोर येथे गेलेले आहेत. या दौऱ्याकरीता अपेक्षित खर्च रु. ८,३७,६२१/- करिता मा. स्थायी समितीची मंजूरी मागीतलेली आहे.

नियमाप्रमाणे अभ्यास दौऱ्याच्या खर्चास प्रथम मंजूरी घेणे आवश्यक होते व त्यानंतर दौऱ्याचे आयोजन करणे योग्य ठरले असते. तरी अशाप्रकारचे नियमबाह्य व बेकायदेशीर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मी सुचना मांडत आहे. पहिला ठराव मतदानाला टाकतो. उपरोक्त संदर्भिय मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या दि. १६/७/२०१३ रोजीच्या ठराव क्र.५ अन्वये महिला व बालकल्याण समितीने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये कोडाईकनॉल, मेंगलोर येथे अभ्यास दौरा आयोजीत करणेबाबत सुचित केलेले आहे. तरी सदरचा अभ्यास दौरा आयोजीत केल्यास महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांना उपयुक्त मार्गदर्शन होण्यास मदत होईल. तरी सन २०१३-१४ या वर्षात महिला व बालकल्याण समितीच्या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याणसाठी कार्यक्रम/प्रशिक्षण/शिबीरे/मेळावे या लेखाशिर्षाखाली ९५ लाख तरतुद आहे. कोडाईकनॉल, मेंगलोर या ठिकाणी अभ्यास दौऱ्याचे दि.२२/९/२०१३ ते दि.२८/९/२०१३ पर्यंत आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सदर प्रशिक्षणास महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या, अधिकारी व कर्मचारी असे एकुण ०९ व्यक्तींचा समावेश करण्याबाबत महिला व बालकल्याण समितीच्या सभापती श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो यांनी कळविलेले आहे. तरी मा. महिला व बालकल्याण समिती अभ्यास दौरा आयोजीत करणेबाबत दिलेल्या जाहिरातीनुसार दरपत्रके मागविण्यात आलेले होते. त्यापैकी तीन दरपत्रके प्राप्त झालेली असुन खालीलप्रमाणे तपशील आहे.

| अ.क्र. | ट्रॅव्हलर्स आणि टुर्स कंपनीचे नाव | प्रती व्यक्ती येणारा खर्च |
|---|---|---|
| १ | श्रीनिश ट्रॅव्हलर्स आणि टुर्स | ९३,०६९ X ९ = ८,३७,६२१ |
| २ | कॉसमॉस ट्रॅव्हलर्स आणि टुर्स | १,०५,३०९ X ९ = ९,४७,७८१ |
| ३ | जी.बी. टुर्स आणि ट्रॅव्हलर्स | ९५,९४९ X ९ = ८,६३,५४१ |

त्यापैकी श्रीनीश ट्रॅव्हल्स आणि टुर्स यांचे दर कमी आहेत. त्यानुसार ९३,०६९ X ९ = ८,३७,६२१ खर्च अपेक्षित आहे. तरी कमी दराचे श्रीनीश ट्रॅव्हल्स आणि टुर्स यांच्या दरपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची (ड) मधील प्रकरण ५(२)(२) अंतर्गत ही सभा मंजुरी देत आहे. या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. सभापती :-**

बर्नड डिमेलो यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ८ मत विरोधात ४ मत आहेत. तटस्थ २ आहेत. तर बर्नड डिमेलो यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८८ :-**

मा. महिला व बालकल्याण समिती अभ्यास दौऱ्याबाबत.

**ठराव क्र. ७९ :-**

उपरोक्त संदर्भिय मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या दि. १६/७/२०१३ रोजीच्या ठराव क्र.५ अन्वये महिला व बालकल्याण समितीने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये कोडाईकनॉल, मेंगलोर येथे अभ्यास दौरा आयोजीत करणेबाबत सुचित केलेले आहे. तरी सदरचा अभ्यास दौरा आयोजीत केल्यास महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांना उपयुक्त मार्गदर्शन होण्यास मदत होईल. तरी सन २०१३-१४ या वर्षात महिला व बालकल्याण समितीच्या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याणसाठी कार्यक्रम/प्रशिक्षण/शिबीरे/मेळावे या लेखाशिर्षाखाली ९५ लाख तरतुद आहे. कोडाईकनॉल, मेंगलोर या ठिकाणी अभ्यास दौऱ्याचे दि.२२/९/२०१३ ते दि.२८/९/२०१३ पर्यंत आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सदर प्रशिक्षणास महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या, अधिकारी व कर्मचारी असे एकुण ०९ व्यक्तींचा समावेश करण्याबाबत महिला व बालकल्याण समितीच्या सभापती श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो यांनी कळविलेले आहे. तरी मा. महिला व बालकल्याण समिती अभ्यास दौरा आयोजीत करणेबाबत दिलेल्या जाहिरातीनुसार दरपत्रके मागविण्यात आलेले होते. त्यापैकी तीन दरपत्रके प्राप्त झालेली असुन खालीलप्रमाणे तपशील आहे.

| अ.क्र. | ट्रॅव्हलर्स आणि टुर्स कंपनीचे नाव | प्रती व्यक्ती येणारा खर्च |
|---|---|---|
| १ | श्रीनिश ट्रॅव्हलर्स आणि टुर्स | ९३,०६९ X ९ = ८,३७,६२१ |
| २ | कॉसमॉस ट्रॅव्हलर्स आणि टुर्स | १,०५,३०९ X ९ = ९,४७,७८१ |
| ३ | जी.बी. टुर्स आणि ट्रॅव्हलर्स | ९५,९४९ X ९ = ८,६३,५४१ |

त्यापैकी श्रीनीश ट्रॅव्हल्स आणि टुर्स यांचे दर कमी आहेत. त्यानुसार ९३,०६९ X ९ = ८,३७,६२१ खर्च अपेक्षित आहे. तरी कमी दराचे श्रीनीश ट्रॅव्हल्स आणि टुर्स यांच्या दरपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची (ड) मधील प्रकरण ५(२)(२) अंतर्गत ही सभा मंजुरी देत आहे. या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्रीम. अनिता पाटील**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्री. राजू भोईर<br>२) श्री. बर्नड डिमेलो<br>३) श्रीम. अनिता जयवंत पाटील<br>४) श्रीम. हेलन गोविंद<br>५) श्री. मुन्ना सिंह<br>६) श्री. प्रमोद जयराम सामंत<br>७) श्री. राजेश वेतोसकर<br>८) सौ. शर्मिला बगाजी | १) श्री. शरद केशव पाटील<br>२) श्री. रोहिदास पाटील<br>३) श्रीम. मिरादेवी यादव<br>४) डॉ. राजेंद्र जैन | १) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील<br>२) श्री. प्रशांत दळवी |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८९, पुर्नविनीयोजन पत्रकास मान्यता देणेबाबत. (सचिव विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

## नमुना क्र. १०
## नियम ३० (३) पहा

| अ. क्र. | या शिर्षातुन | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रधान, गौण व तपशिल शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचा खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिल शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचा खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | नगरसेवक मानधन | - | १२५ लक्ष | ४२.८८ लक्ष | ८२.११ लक्ष | मनपा सार्वत्रिक / पोट निवडणूक | - | १० लक्ष | ९.३० लक्ष | २० लक्ष | नगरसेवक मानधन या लेखा शिर्षाखाली नजीकच्या काळात मोठा खर्च होण्याची फारच कमी शक्यता असून मार्च २०१३ पर्यंत होणारा खर्च गृहीत धरुन या लेखाशिर्षातून रु. २० लक्ष इतकी तरतुद मनपा सार्वत्रिक / पोटनिवडणूक या लेखाशिर्षात वर्ग करणेस शिफारस आहे. |

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानमते मंजूर करण्यात येत आहे

**प्रकरण क्र. ८९ :-**

पुर्नविनीयोजन पत्रकास मान्यता देणेबाबत. (सचिव विभाग)

**ठराव क्र. ८० :-**

## नमुना क्र. १०
## नियम ३० (३) पहा

| अ. क्र. | या शिर्षातुन | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रधान, गौण व तपशिल शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचा खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिल शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचा खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | नगरसेवक मानधन | - | १२५ लक्ष | ४२.८८ लक्ष | ८२.११ लक्ष | मनपा सार्वत्रिक / पोट निवडणूक | - | १० लक्ष | ९.३० लक्ष | २० लक्ष | नगरसेवक मानधन या लेखा शिर्षाखाली नजीकच्या काळात मोठा खर्च होण्याची फारच कमी शक्यता असून मार्च २०१३ पर्यत होणारा खर्च गृहीत धरुन या लेखाशिर्षातून रु. २० लक्ष इतकी तरतुद मनपा सार्वत्रिक / पोटनिवडणूक या लेखाशिर्षात वर्ग करणेस शिफारस आहे. |

**सुचक :- श्री. बर्नढ डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९० सन्मा. नगरसेवक यांना मोबाईल टॅबलेट उपलब्ध करुन देणेबाबत.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन्मा. नगरसेवक यांना मनपाच्या दैनंदिन आर्थिक व प्रशासकीय कामकाजाचे निरीक्षण व नियंत्रण करणे कामाकरिता टॅब उपलब्ध करुन देणेकरीता सन्मा. सभागृह नेते व सन्मा. महापौर यांनी पत्रान्वये कळविले आहे. यापुर्वी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१३-१४ करीता अर्थसंकल्पामध्ये संगणक विभागाच्या "संगणक सॉफ्टवेअर / हार्डवेअर खरेदी" या लेखाशिर्षाअंतर्गत आर्थिक तरतूद करण्यात आली असून त्याबाबत चर्चा देखील मा. स्थायी समिती अर्थसंकल्प मंजुरी २०१३-१४ च्या सभेमध्ये करण्यात आलेली होती.

उपरोक्त कामी प्रचलित सॅमसंग कंपनीच्या नविनतम सॅमसंग टॅबलेट ३ (३११) चे मे. सॅमसंग इंडीया च्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेली दर रक्कम रु. २५,५००/- प्रति टॅबलेट असे आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या एकूण १०० सन्मा. नगरसेवक यांना १०० टॅबलेट व नगरसचिव यांना १ से १०१ मोबाईल टॅबलेट खरेदी करणेकरीता अंदाजित रक्कम रु. २५,७५,५००/- इतक्या अपेक्षित खर्चास महाराष्ट्र अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार ही स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.

सदर मोबाईल टॅबलेटमध्ये लागणारे सिम कार्ड व त्यानंतर येणाऱ्या मोबाईल वापराच्या देयकाची जबाबदारी ही संबंधित सन्मा. नगरसेवक यांची राहील. तसेच सन्मा. नगरसेवक यांचा कार्यकाल संपलेनंतर सदरचे मोबाईल टॅबलेट मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभाग येथे जमा करणे बंधनकारक राहील.

सदरची खरेदी उत्पादक कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून करुन त्यांचे कडून सॅमसंग कंपनीचे ऑथोरायझेशन प्रमाणपत्र व दरपत्रक या स्वरुपात दर मागवून न्युनतम दरांस मंजुरी देऊन पुढील कार्यवाही करणेत यावी, असा मी ठराव मांडत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**राजेंद्र जैन :-**

यह जो टॅबलेट देने का प्रस्ताव है। यह एक धोरणात्मक निर्णय है, यह पॉलिसी मॅटर है। क्या यह डायरेक्ट मा. महासभा में से डायरेक्ट स्थायी समिती में आ सकता है?

**बर्नड डिमेलो :-**

आपण तरतुद केलेली आहे. आणि ह्याची मंजुरी दिलेली आहे. आपण अर्थसंकल्पात होता. तेव्हा ह्याला आर्थिक मंजुरी मिळालेली आहे.

**राजेंद्र जैन :-**

यह पॉलिसी मॅटर है।

**शरद पाटील :-**

मा. सभापती महोदय, आम्हाला त्याची माहिती द्यायला सांगा ना. धोरणात्मक निर्णय आहे तो. हा महासभेपुढे आला पाहिजे की, डायरेक्ट इथे घेता येतो.

**भागवत मुरकुटे :-**

मा. स्थायी समितीने व मा. महासभेने अंदाज पत्रकात मान्यता दिलेली आहे. त्यामुळे मा. महासभेची मान्यतेची आवश्यकता नाही.

**राजेंद्र जैन :-**

हमे लगता है मा. महासभा में आना चाहिए। यह पॉलिसी मॅटर है, वह बोलते है जरुरत नही है। यह किस नियम के अंतर्गत है की, यह पॉलिसी मॅटर डायरेक्ट स्थायी समिती में आ सकता है। यह नियम कौनसा बोलता है।

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क. ९० :-**

सन्मा. नगरसेवक यांना मोबाईल टॅबलेट उपलब्ध करुन देणेबाबत.

**ठराव क्र. ८१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन्मा. नगरसेवक यांना मनपाच्या दैनंदिन आर्थिक व प्रशासकीय कामकाजाचे निरीक्षण व नियंत्रण करणे कामाकरिता टॅब उपलब्ध करुन देणेकरीता सन्मा. सभागृह नेते व सन्मा. महापौर यांनी पत्रान्वये कळविले आहे. यापुर्वी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१३-१४ करीता अर्थसंकल्पामध्ये संगणक विभागाच्या "संगणक सॉफ्टवेअर / हार्डवेअर खरेदी" या लेखाशिर्षाअंतर्गत आर्थिक तरतूद करण्यात आली असून त्याबाबत चर्चा देखील मा. स्थायी समिती अर्थसंकल्प मंजुरी २०१३-१४ च्या सभेमध्ये करण्यात आलेली होती.

उपरोक्त कामी प्रचलित सॅमसंग कंपनीच्या नविनतम सॅमसंग टॅबलेट ३ (३११) चे मे. सॅमसंग इंडीया च्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेली दर रक्कम रु. २५,५००/- प्रति टॅबलेट असे आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या एकूण १०० सन्मा. नगरसेवक यांना १०० टॅबलेट व नगरसचिव यांना १ से १०१ मोबाईल टॅबलेट खरेदी करणेकरीता अंदाजित रक्कम रु. २५,७५,५००/- इतक्या अपेक्षित खर्चास महाराष्ट्र अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार ही स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.

सदर मोबाईल टॅबलेटमध्ये लागणारे सिम कार्ड व त्यानंतर येणाऱ्या मोबाईल वापराच्या देयकाची जबाबदारी ही संबंधित सन्मा. नगरसेवक यांची राहील. तसेच सन्मा. नगरसेवक यांचा कार्यकाल संपलेनंतर सदरचे मोबाईल टॅबलेट मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभाग येथे जमा करणे बंधनकारक राहील.

सदरची खरेदी उत्पादक कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून करुन त्यांचे कडून सॅमसंग कंपनीचे ऑथोरायझेशन प्रमाणपत्र व दरपत्रक या स्वरुपात दर मागवून न्युनतम दरांस मंजुरी देऊन पुढील कार्यवाही करणेत यावी, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९१ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानात, मैदानात व इतर ठिकाणी नविन खेळणी, बेचेंस पुरवठा व जुनी खेळणी दुरुस्ती करणेकामी आलेल्या वार्षिक निविदांना मंजूरी मिळणेबाबत.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानात, मैदानात व इतर ठिकाणी नविन खेळणी, बेंचेस पुरवठा व जुनी खेळणी दुरुस्ती करणेकामी मा. आयुक्त सो. यांच्या दि.१६/०५/२०१३ रोजीच्या मान्यंतेने (निविदा प्रसिध्दीस) दि.१३/०६/२०१३ रोजीच्या जाहीर निविदा सुचनेप्रमाणे दै.खबर आजतक, दै.प्रहार या वृत्तपत्रात तसेच e-Tendering प्रणालीद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेची मुदत दि.२४/०६/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत होती. त्यानुसार दि.१४/०६/२०१३ ते दि. २४/०६/२०१३ या कालावधीत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

**१. मे. अरिहंत इंडस्ट्रीयल कार्पोरेशन लि.**
**२. मे. बाबा प्ले वर्ल्ड**
**३. मे. हनी फन एन-थ्रील कंपनी**

वरीलप्रमाणे प्राप्त एकुण तीनही निविदा विहित मुदतीत व तांत्रीक दृष्टया प्राप्त झाल्या असुन सदर निविदांची Financial Bid उघडणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी दि. ०६/०७/२०१३ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार दि. ०८/०७/२०१३ रोजी सदर निविदेचे Financial Bid उघडून तुलनात्मक तक्ता / विवरणपत्र सोबत जोडले असुन त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Description of Item | ARIHANT INDUSTRIAL CORPORATION LTD. | BABA PLAY WORLD | HONEY FUN N THILL CO. |
|---|---|---|---|---|
| 1. | DELUXE SLIDE (SS) | Rs.63963/- | **Rs.58900/-** | Rs.65402/- |
| 2. | TRIPLE WAVE SLIDE | Rs.2,58,000/- | **Rs.2,15,500/-** | Rs.2,63,805/- |
| 3. | WAVE SLIDE (FRP) | Rs.93,740/- | **Rs.88,500/-** | Rs.95,849/- |
| 4. | FRP Deluxe Plain Slide - 1.5 MTR | Rs.72059/- | Rs.71800/- | **Rs.70,438/-** |
| 5. | FRP Deluxe Plain Slide - 2.1 MTR. | Rs.93031/- | Rs.92500/- | **Rs.90938/-** |
| 6. | FRP Wave Slide - 1.5 MTR. | Rs.72025/- | **Rs.52900/-** | Rs.70646/- |
| 7. | CURVE SLIDE | **Rs.161788/-** | Rs.166500/- | Rs.165428/- |
| 8. | ROLLER SLIDE | Rs.77400/- | **Rs.74500/-** | Rs.79142/- |
| 9. | Roller Slide - 2.1 MTR. | Rs.111422/- | Rs.110800/- | **Rs.108915/-** |
| 10. | FRP ROLLER SLIDE – | Rs.123518/- | **Rs.120500/-** | Rs.126297/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11. | FRP Mini Wave Slide - 0.9 MTR. | Rs.26875/- | **Rs.25200/-** | Rs.26180/- |
| 12. | FRP Spiral Slide - 1.5 MTR | Rs.179609/- | **Rs.175200/-** | Rs.177210/- |
| 13. | FRP Spiral Slide - 2.1 MTR | Rs.226608/- | Rs.223500/- | **Rs.221509/-** |
| 14. | FRP Mini Tube Slide - 1.5 MTR. | Rs.174016/- | Rs.171800/- | **Rs.170101/-** |
| 15. | DOUBLE ARCH SWING | Rs.51063/- | **Rs.46200/-** | Rs.52211/- |
| 16. | Double Swing - ECO | Rs.37238/- | Rs.37900/- | **Rs.36400/-** |
| 17. | Double Toddler Swing | Rs.35169/- | Rs.35900/- | **Rs.34378/-** |
| 18. | DELUXE SWING | Rs.62000/- | **Rs.55200/-** | Rs.63395/- |
| 19. | GARDEN SWING | Rs.68724/- | Rs.68900/- | **Rs.67178/-** |
| 20. | Three In One | Rs.33125/- | Rs.33800/- | **Rs.32380/-** |
| 21. | Four In One | Rs.43215/- | **Rs.38900/-** | Rs.44187/- |
| 22. | Four Seat Arch Swing | Rs.97750/- | Rs.96900/- | **Rs.95551/-** |
| 23. | Cross - N – Zero | Rs.12470/- | Rs.12900/- | **Rs.12189/-** |
| 24. | TWINDLER GO ROUND | **Rs.66543/-** | Rs.68900/- | Rs.68040/- |
| 25. | Platform MGR FRP Top | Rs.78942/- | Rs.79200/- | **Rs.77166/-** |
| 26. | Platform MGR Metal Top | Rs.60000/- | Rs.59800/- | **Rs.58650/-** |
| 27. | ANIMAL MERRY GO ROUND | Rs.67050/- | **Rs.55900/-** | Rs.65575/- |
| 28. | Four seat MGR | **Rs.51574/-** | Rs.52100/- | Rs.52761/- |
| 29. | STANDARD SEE-SAW | Rs.13975/- | **Rs.11900/-** | Rs.14289/- |
| 30. | MULTI SEATER SEE - SAW | Rs.26338/- | **Rs.24800/-** | Rs.26930/- |
| 31. | Double See Saw | Rs.26350/- | Rs.26900/- | **Rs.25757/-** |
| 32. | A TO B | **Rs.36550/-** | Rs.36600/- | Rs.37372/- |
| 33. | WALKING BARREL | Rs.37500/- | Rs.37900/- | **Rs.36656/-** |
| 34. | CIRCULAR SWING | Rs.46978/- | **Rs.42800/-** | Rs.48034/- |
| 35. | SKY ROCKER | **Rs.24403/-** | Rs.25900/- | Rs.24952/- |
| 36. | Balancing Bridge | Rs.71000/- | Rs.70900/- | **Rs.69403/-** |
| 37. | Crystal Maze | Rs.59000/- | Rs.58900/- | **Rs.57673/-** |
| 38. | Criss Cross Climber | Rs.46548/- | **Rs.45800/-** | Rs.47595/- |
| 39. | Loop Climber | Rs.36980/- | **Rs.35900/-** | Rs.36148/- |
| 40. | TURBO TOWER | Rs.49354/- | Rs.50900/- | **Rs.48268/-** |
| 41. | S Bridge Climber | Rs.46500/- | Rs.49000/- | **Rs.45454/-** |
| 42. | Twin Climber | Rs.18490/- | Rs.18200/- | **Rs.18074/-** |
| 43. | TWISTED CLIMBER | **Rs.92450/-** | Rs.96800/- | Rs.94530/- |
| 44. | SATELLITE SCRAMBLER | Rs.70128/- | Rs.69800/- | **Rs.68585/-** |
| 45. | DOUBLE BAR | Rs.14500/- | Rs.14300/- | **Rs.14174/-** |
| 46. | LOOP RUNG | Rs.36980/- | **Rs.35200/-** | Rs.37812/- |
| 47. | TODDLER SWING | Rs.35153/- | **Rs.34200/-** | Rs.35943/- |
| 48. | ROCKING BOAT | Rs.14513/- | Rs.14200/- | **Rs.14186/-** |
| 49. | SPRING RIDER : BIKE | Rs.25800/- | **Rs.24500/-** | Rs.26381/- |
| 50. | SPRING RIDER : JUMBO | Rs.29025/- | **Rs.28500/-** | Rs.29678/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 51. | Spring Rider | Rs.19200/- | Rs.19100/- | **Rs.18768/-** |
| 52. | SPRING RIDER SHARK | **Rs.28054/-** | Rs.28500/- | Rs.28700/- |
| 53. | SPRING RIDER RACER | **Rs.28703/-** | Rs.28800/- | Rs.29348/- |
| 54. | SPRING RIDER SCOOTY | **Rs.28703/-** | Rs.28900/- | Rs.29348/- |
| 55. | SPRING RIDER AEROPLAIN | **Rs.26375/-** | Rs.27500/- | **Rs.26375/-** |
| 56. | VIP BENCH | Rs.31068/- | **Rs.27900/-** | Rs.31767/- |
| 57. | STADIUM BENCH(FRP) | Rs.23865/- | **Rs.22200/-** | Rs.24402/- |
| 58. | Deluxe Bench | Rs.21000/- | Rs.21500/- | **Rs.20528/-** |
| 59. | Deluxe Bench FRP | Rs.22800/- | Rs.23900/- | **Rs.22287/-** |
| 60. | Blossom Bench | Rs.24000/- | Rs.23900/- | **Rs.23460/-** |
| 61. | Plank Bench FRP | Rs.23000/- | Rs.22800/- | **Rs.22483/-** |
| 62. | Standard Bench | Rs.10858/- | **Rs.9900/-** | Rs.11102/- |
| 63. | Dustbin SS | Rs.11610/- | **Rs.9800/-** | Rs.10880/- |
| 64. | Cartoon Bin | Rs.14200/- | Rs.14500/- | **Rs.13881/-** |
| 65. | NET ROCK SCRAMBLER | Rs.59878/- | **Rs.51000/-** | Rs.61225/- |
| 66. | Net Rock Climber - 2.1 MTR | Rs.58400/- | Rs.58100/- | **Rs.57086/-** |
| 67. | Multi Activity Play System : MAPS 06 | Rs.670800/- | **Rs.660000/-** | Rs.685893/- |
| 68. | Multi Activity Play System : MAPS 07 | Rs.435375/- | **Rs.428000/-** | Rs.445171/- |
| 69. | Multi Activity Play System : MAPS 12 | Rs.288100/- | **Rs.225500/-** | Rs.294582/- |
| 70. | Multi Activity Play System : MAPS 25 | Rs.805175/- | **Rs.775000/-** | Rs.853291/- |
| 71. | Multi Activity Play System : THEME 06 | **Rs.801950/-** | Rs.850000/- | Rs.819994/- |
| 72. | Multi Activity Play System : THEME 19 | Rs.672950/- | Rs.680000/- | **Rs.657809/-** |
| 73. | Multi Activity Play System : THEME 22 | **Rs.638550/-** | Rs.645000/- | Rs.652917/- |
| 74. | MPPS-12 | Rs.671000/- | Rs.661800/- | **Rs.655903/-** |
| 75. | MPPS-17 | Rs.1160000/- | Rs.1155000/- | **Rs.1133900/-** |
| 76. | MPPS-36 | Rs.610000/- | Rs.605000/- | **Rs.596275/-** |
| 77. | MPPS-44 | Rs.820000/- | Rs.818900/- | **Rs.801550/-** |

**FOR PLAY GROUND EQUIPMENT REPAIRING, FITTHING OF SPARE PARTS ,& PAINTING**

| S. N. | ITEM | DESCRIPTION | ARIHANT INDUSTRIAL CORPORATION LTD. | BABA PLAY WORLD | HONEY FUN N THILL CO. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | SWING | "S" HOOK & CLAMP / BEARING | 2881 | **2450** | 5953 |
| 2. | | BELT ASSEMBLY WITH CHAIN | 8946 | **8750** | 9170 |
| 3. | | BELT SEET WITH HOOK | 4345 | **4250** | 4454 |
| 4. | | BUCKET ATTACHMENT | 8051 | **7800** | 8253 |
| 5. | DELUXE SWING | PVC SHEET | 5802 | **4200** | 5947 |
| 6. | | SEAT ASSLY.WITH CHAIN & BEARING | 20768 | **18500** | 19200 |
| 7. | CIRCULAR SWING | BEARING SET | 12358 | **9800** | 10900 |
| 8. | | ROTO SEAT | 3834 | **2500** | 3600 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9. | STD , SEE SAW | SEAT WITH HANDLE ETC. | 3527 | 3500 | **3439** |
| 10. | MULTY | SEESAW LEVER SEAT | 12397 | **10500** | 12707 |
| | | **MERRY GO ROUND** | | | |
| 11. | MERRY GO ROUND | BEARING SHAFT | 20857 | **18500** | 21378 |
| 12. | | MGRP CHECKER PLATE SET | 38621 | **28900** | 37656 |
| 13. | | CHAIR SEAT & ANIMAL FRP | 12968 | **10900** | 12652 |
| | | **CLIMBER** | | | |
| 14. | CLIMBER | CRYSTAL MAZE / SUNSET PIPES/ PLATES | 1386 | **950** | 1346 |
| 15. | SATTELITE | CHAIN LADDER | 57151 | **4800** | 5607 |
| 16. | ALL NET CLIMBER | P. P. ROPE PER METER | 405 | **380** | 450 |
| 17. | | P. P. ROPE CLAMPS | 697 | **550** | 750 |
| | | **SLIDES** | | | |
| 18. | SLIDES | TRIANGLE STEPS | 1300 | **900** | 1390 |
| 19. | | PLATFORM | 5316 | **4500** | 5500 |
| 20. | | LADDER FRAME (7') | 5800 | **4900** | 5850 |
| 21. | WAVE SLIDE | SLIDING CHUTE 5' HT (FRP) | 47158 | **35900** | 48337 |
| 22. | | SLIDING CHUTE 7' HT (FRP) | 59810 | **42900** | 61306 |
| 23. | DELUXE SLIDE | SLIDING CHUTE 5' HT ( S.S. 16 GUAGE ) | 46008 | **38900** | 45650 |
| 24. | | SLIDING CHUTE 7' HT ( S.S. 16 GUAGE ) | 57150 | **48900** | 58948 |
| 25. | ROLLER | ROLLER | 1470 | **1200** | 1506 |
| 26. | | PIPE & PIN | 486 | **350** | 498 |
| 27. | TUBE SLIDE | SLIDING MODULE | 101409 | **75900** | 98874 |
| 28. | | LANDING MODULE | 41024 | **25900** | 39998 |
| 29. | SPIRAL SLIDE | SLIDING CHUTE 5' HT | 155219 | **95800** | 151339 |
| 30. | | SLIDING CHUTE 7' HT | 230040 | **185000** | 224289 |
| 31. | | SLIDING CHUTE 10' HT | 255000 | **210000** | 248625 |
| 32. | ALL FRP SLIDE | GEL COATING | 57114 | **48900** | 55686 |
| 33. | E BENCH | STRIPS FOR SEAT | 2300 | **1800** | 2358 |
| 34. | VIP BENCH | STRIPS FOR SEAT (FRP) | 4601 | **2100** | 4486 |
| 35. | BALANC. BRIDGE | P.P. ROPE WITH CLAMPS | 9968 | **7500** | 9719 |
| 36. | | WIRE ROPE | 9674 | **5800** | 9433 |
| 37. | | ROTO FLOATS | 8243 | **5900** | 8037 |
| 38. | | D' SHACKLES 3/4" | 1099 | **800** | 1072 |
| 39. | SWINGING BRIDGE | WOODEN /FRP/ROTO PLANK | 3451 | **2900** | 3537 |
| 40. | ROLLING BARREL | ROLLER SET | 64000 | **55000** | 62400 |
| 41. | WALK. BARREL | ROTO DRUM | 12141 | **9800** | 11837 |
| 42. | | BEARING ASSLY | 8964 | **5500** | 8722 |
| 43. | CROSS & ZERO | X' & '0 ' BOX | 959 | **750** | 982 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **KIDDIES RANGE** | | | |
| 44. | COMBINATION | ROTTO/FRP SLIDE | 17253 | **12500** | 16822 |
| 45. | | BUCKET ASSEMBLY | 3246 | **2800** | 3165 |
| 46. | SET | SEE SAW (BABY SEAT) | 1789 | **1250** | 1744 |
| 47. | SPRING RIDER | DUCK /WHALE/PONY | 12269 | **7900** | 12576 |
| 48. | | STAND | 4831 | **3500** | 4952 |
| 49. | | SPRING | 11200 | **5900** | 11480 |
| 50. | | PEDDLE | 1406 | **1100** | 1441 |
| 51. | MPPS | ROTO RAILING | 21023 | **12900** | 21549 |
| 52. | | SWINING BRIDGE 2.4/1.8 MLG | 76362 | **45900** | 74500 |
| 53. | | PLAIN BRIDGE 2.4/1.8 MLG | 83025 | **47900** | 81000 |
| 54. | | SQUARE DECK PLATFORM | 34506 | **15900** | 32500 |
| 55. | | FRP CANOPY PART | 12777 | **9900** | 12200 |
| 56. | | HEXAGONAL DECK PLATFORM | 47158 | **24900** | 43500 |
| 57. | | SWINGING BRIDGE CHAIN | 7063 | **5900** | 6850 |
| 58. | | MAPS NYLON CLAMP | 959 | **750** | 950 |
| 59. | | MPPS DECK HANDLE | 980 | **850** | 970 |
| 60. | | ALUMINIUM CHERKED PLATE9.3 X 32 | 21200 | **12900** | 21730 |
| 61. | | TUBE SLIDE TOP COVER | 49413 | **32900** | 48177 |
| 62. | | SPIRAL CLIMBER | 19170 | **18900** | **18900** |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता नविन खेळणी व बेचेंस पुरवठा करणेकामी **अरिहंत इन्डस्ट्रीयल कार्पोरेशन लि. यांचे अनु.क्र.**७,२४,२८,३२,३५,४३,५२,५३,५४,५५,७१ व ७३, **बाबा प्ले वर्ल्ड यांचे अनु.क्र.** १,२,३,६,८,१०,११,१२,१५,१८,२१,२७,२९,३०,३४,३८,३९,४६, ४७,४९,५०,५६,५७,६२,६३,६५,६७,६८,६९ व ७०, **हनी फन एन थ्रील कंपनी अनु. क्र.**४,५, ९,१३,१४,१६,१७,१९,२०,२२,२३,२५,२६, ३१,३३,३६,३७,४०,४१,४२,४४,४५,४८,५१,५५,५८,५९,६०,६१,६४,६६,७२,७४,७५,७६ व ७७ या कंपन्यांचे निविदेतील दर कमी असल्याचे दिसून आले. त्याचबरोबर **अरिहंत इंडस्ट्रियल कॉर्पोरेशनचे लि.** यांचे व **हनी फन-एन-थ्रील कं.** यांचे अ.क्र.५५ चे निविदेतील दर **सारखेच** असल्याचे दिसून येते.

तसेच खेळणी दुरुस्ती बाबतचे **बाबा प्ले वर्ल्ड** यांचे अ.क्र.१,२,३,४,५,६,७,८,१०,११, १२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४१,४२, ४३,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५१,५२,५३,५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६१ व ६२ व **हनी फन-एन-थ्रील कंपनी** यांचे अ.क्र.९ चे निविदेतील दर कमी असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर **बाबा प्ले वर्ल्ड** व **हनी फन-एन-थ्रील कं.** यांचे अ.क्र.६२ चे निविदेतील दर **सारखेच** असल्याचे दिसून येते.

परंतु सदर कामी आलेल्या कमी दराच्या निविदेतील **बाबा प्ले वर्ल्ड** यांनी दि.२०/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये नविन खेळणी पुरवठा करणेकामी सद्यस्थितीत आमच्या कंपनीची आर्थिक बाजु ठिक नसल्याने व शासनाचे कर जास्त असल्याने नविन खेळणी पुरवठा करु शकणार नाही असे कळविले आहे. त्यानुसार निविदेतील क्रमांक दोनचे (**L2**) निविदाधारक **अरिहंत इन्डस्ट्रीयल कार्पोरेशन लि.** यांना मनपा/जा.क्र./वृ.प्रा/१६८/२०१३-१४ दि.२३/०७/२०१३ व **हनी फन-एन-थ्रिल कंपनी** यांना जा.क्र.मनपा/वृ.प्रा/१६९/२०१३-१४ दि.२३/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये **बाबा प्ले वर्ल्ड** यांनी सादर केलेल्या दरानुसार आपण काम करण्यास तयार असल्याबाबत पत्रव्यवहार केले असता **अरिहंत इंडस्ट्रियल कार्पोरेशन लि.** यांनी दि.२४/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये व तसेच **हनी फन-एन-थ्रिल कंपनी** यांनी सुध्दा दि.२४/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये **बाबा प्ले वर्ल्ड** यांच्या निविदेतील (**L1**) दराने काम करण्यास तयार आहेत असे कळविले आहे.

त्यानुसार **अरिहंत इंडस्ट्रियल कार्पोरेशन लि.** हे अ.क्र.१,२,३,८,१०,१५,१८,२१,२९, ३०,३४,३८,४१,४७,४९,५०,५६,५७,६२,६३,६५,६७,६८,६९ व ७० हे निविदेतील अ.क्र.२ चे (**L2**) चे निविदाकार असून ते सदरील अनुक्रमांका बाबत निविदेतील **बाबा प्ले वर्ल्ड** (**L1**) निविदाकार यांच्या दराने काम करण्यास तयार आहेत. तसेच **हनी फन-एन-थ्रील कंपनी** हे अ.क्र.६,११,१२,२७ व ३९ हे निविदेतील अ.क्र.२ चे (**L2**) चे निविदाकार

असून ते सदरील अनुक्रमांका बाबत निविदेतील बाबा प्ले वर्ल्ड (L1) निविदाकार यांच्या दराने काम करण्यास तयार आहेत.

तरी उपरोक्त सादर प्रमाणे नविन खेळणी व बेचेंस पुरवठा करणेकामी व जुनी खेळणी दुरुस्ती करणेकामी आलेल्या कमी दराच्या निविदा स्विकारणेंस **मा. आयुक्त सो.** यांनी दि.०४/०९/२०१३ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी उद्याने/दुभाजक सुशोभिकरण करणे या लेखाशिर्षाखाली रु.१०००.०० लाख (रु.दहा कोटी मात्र) ची तरतुद केलेली आहे. तरी तरी उपरोक्त सादर प्रमाणे नविन खेळणी व बेचेंस पुरवठा करणेकामी व जुनी खेळणी दुरुस्ती करणेकामी आलेल्या वार्षिक निविदेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा.स्थायी समिती सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशाकिय मंजुरी देत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

१० कोटी म्हणजे काय?

**बर्नड डिमेलो :-**

चुकून बोललो. प्रिंट मध्ये मिस्टेक झालेली आहे.

**शरद पाटील :-**

प्रिंट मिस्टेक झाली म्हणजे काय? ठराव झाला हा.

**बर्नड डिमेलो :-**

एक कोटी आहे. चुकून झालेल आहे.

**शरद पाटील :-**

ह्यासाठी ५० लाखाची तरतुद आहे. आणि तुम्ही १ कोटी कस काय सांगता.

**बर्नड डिमेलो :-**

टोटल १० कोटी सांगितले.

**शरद पाटील :-**

त्याला तरतुद ५० लाखाची आहे.

**नागेश इरकर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. सदरची तरतुद थिम पार्क, लॅन्ड स्केपिंग, खेळणी बसवणे हे सर्व मिळून १० कोटीच आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आमच्याकडे कशाला मंजुरी मागता?

**नागेश इरकर :-**

खेळणी बसवण्यासाठी.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मा. सभापती साहेब, हे तुमचे अधिकार आहे. हे असे जे.इ. एस.ई. डेप्युटी, एक्झीक्युटीव्ह काहीतरी तुमच्या हातात देणार आणि तुम्ही आमच्या समोर मांडणार. हे नाही चालणार.

**शरद पाटील :-**

५० लाखाची तरतुद आहे आणि तुम्ही १ कोटीची मंजुरी कशी घेतात.

**नागेर इरकर :-**

तरतुद एकत्रित आहे. साधारण ५० ते ६० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

**शरद पाटील :-**

अस तुमच्या ठरावात नाही. तुम्ही ठराव कुठचा मांडता. आज १० कोटीला मंजुरी देतात.

**रोहिदास पाटील :-**

एकमताने ठराव झाला पाहिजे. पण हे अस नाही ना.

**शरद पाटील :-**

आज ह्या ठरावाला अनुमोदन झाल. सगळ झाल, असच जर कोणी लक्ष नाही दिल १० कोटीची मंजुरी म्हणजे काय झाल? ह्याला जबाबदार कोण?

**रोहिदास पाटील :-**

उपायुक्त साहेबांना उत्तर देऊ द्या. तुम्हाला काय मागायच ते स्पष्ट मागा. १२५ ला मंजुरी देतो ना.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. लेखाशिर्ष एकच असल्या कारणाने एकुण तरतुद १० कोटींची आहे. हे बरोबर आहे. तथापी त्याच्यामध्ये आपले प्रस्तावित ते थिम पार्क होते, ११७, २२१ आणि १०० नंबर आहे. त्याच्या सकट जे काही इलेक्ट्रॉनिक खेळणी बसवणार होतो, खेळण्याचे साहित्य वगैरे त्यासाठीच एकत्रित लेखाशिर्षामध्ये ही तरतुद होती. अनावधाने त्याच्यामध्ये खेळणी किती आहे. ते आजच्या घडीला ५० लाख किंवा ६० लाख अस स्पेसिफिक आम्ही ह्याच्यासाठी मेन्शन केल नाही. कारण ह्या आधी दरवर्षी उद्यानामध्ये वेगवेगळ्या

पदाधिका-यांनी मागणी केल्यानुसार आपण इन्डीवीज्युअल एका-एका उद्यानाचे वेगवेगळे प्रस्ताव तयार करुन कधी ऑफलाईन कधी ऑनलाईन निविदा काढून इल्डीवीज्युअल खेळणी बसवण्याच काम आपण उद्यानात करत होतो. तथापी ही निविदा वार्षिक असल्या कारणाने आजच्या तारखेत अस एकंदरीत सांगता येणार नाही की ५० लाख खर्च होणार की ६० लाख खर्च होणार. जशी मागणी येईल आणि तिथे खेळणी बसवता येईल हा तसा मुद्दा असल्यामुळे त्याच्यामध्ये थोडाफार फरक होईल. पण अस सांगता येईल कदाचित की गेल्यावर्षी जो आहे ........

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे ह्याचा अर्थ तुम्ही १० कोटीला मंजुरी मागता असच झाल ना.

**शरद पाटील :-**

साहेब ही काय प्रायव्हेट कंपनी आहे का?

**रोहिदास पाटील :-**

१२०० कोटी तुम्हीच घेऊन टाका. तुम्हाला सभागृहाची गरज नाही.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती महोदय, तेच निवेदन करतो की, आम्हाला अनावधाने तो आकडा टाकायचा राहिला आहे. तथापी साधारणतः तो गेल्यावर्षीचा खर्च जर बघीतला आपण तर साधारणतः एक सव्वा कोटींच्या आसपास सर्व झालेल आहे. तेवढ्या पेक्षा जास्तीची तरतुदीची आवश्यकता कदाचित भासणार नाही. मागच्या वेळेस आपण भरपुर खेळणी खरेदी केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. नगरसेवकांनी कोणीही मागणी केली अस त्यांच नाव निशाण कळत त्याला दुमत नाही. मॅडम, तुम्ही मागितल आम्ही नाही सांगणार नाही. आम्ही मागितल तेव्हा तुम्ही नाही सांगणार नाही.

**राजेश वेतोसकर :-**

अगोदर ठरावात टाकायला पाहिजे ना.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

अनावधाने तो आकडा टाकायचा राहिला आहे. परंतु, साधारणतः एक कोटीच्या आसपास रक्कम राहिल. ठरावात दुरुस्त करा.

**राजेश वेतोसकर :-**

ठरावामध्ये दुरुस्त करुन घ्या. आणि त्यांच्याकडून पुन्हा ठराव करुन घेऊ.

**शरद पाटील :-**

वार्षिकरित्या तुम्ही एकदाच मंजुरी घेणार का? सभापती महोदय, तुम्ही वार्षिक एकच टेंडर काढणार. त्याच्यापेक्षा मा. स्थायी समिती ही एक-एक आठवड्याने होत असते. आणि तुम्ही मंजुरी एकाच वेळी घेऊ शकला नाही. एकाच वेळी तुम्ही एक-सव्वा कोटीला मंजुरी घ्यायच कारण काय?

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य बर्नड डिमेलो यांची मागणी आहे अस आणल तरी आम्ही एकमताने त्याला देऊ.

**प्रशांत दळवी :-**

विषय असा आहे. गेल्या वर्षभर आम्ही मागणी करतो. उपायुक्त साहेब, माझ अस म्हणन आहे की, ज्या निविदा तुमच्याकडे येत होत्या. त्या तुम्ही फेटाळत होते ना. कोण फेटाळत होत? त्या निविदा स्टँडींगमध्ये का येत नव्हत्या? एक वर्ष का आल्या नाही?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

निविदा ह्या एप्रिल पासुन प्रस्तावित केल्या. त्या विभागाने परंतु, त्या निविदेमध्ये अटिशर्ती ज्या आहेत त्याची पुर्तता करीत नसल्यामुळे काही वेळेस फेरनिविदा मागविण्यात आलेल्या आहेत. काही वेळेस मुदतवाढ सुध्दा दिलेली आहे. त्या अनुषंगाने हा कालावधी मध्यंतरीचा गेलेला आहे. ऑलरेडी विषयपत्रिकेवर येण्यासाठी, स्टँडिंग कमिटीवर येण्यासाठी मान्यता नसल्यामुळे किंवा अटिशर्ती मुळे याला उशिर झालेला आहे. हे ही मान्य करता येईल. तथापी तरतुदीचा या बाबतीत जो मुद्दा आहे वार्षिक निविदा याबाबतीत उद्यान विभागात इंडिव्हीज्युअल मैदानात किंवा गार्डनच्या बाबतीत ज्या निविदा मागवण्यात येत होत्या त्या इंडिव्हीज्युअल मागविण्यात येत होत्या. परंतु, वार्षिक निविदे बाबतीत आयुक्त महोदयांनी मंजुरी दिल्याने सगळे विषय हे वार्षिक निविदेच्या मंजुरीसाठी आलेले आहेत.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आज तुम्ही इथे पूर्ण लिस्ट दिलेली आहे. त्या लिस्टच्या माध्यमातुन त्याची कॉन्टीटी परत त्याची प्राईज काय ते तर तुम्हाला माहित असेल ना. मग त्या हिसाबाने तुम्ही त्याची मंजुरी मागा ना.

**रोहिदास पाटील :-**

२५ आयटम द्या ना. त्या २५ आयटमला आम्ही मंजुरी देतो ना.

**शरद पाटील :-**

आम्ही तुम्हाला कुठच्या मंजुरीसाठी विरोध करतो का? अस तुम्ही एकदम संगती आणणार आणि त्याच्यावर तुम्ही मंजुरी मागता अस चालत का?

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, मी काय बोलतो आता ठराव मी वाचला ना तर आता ह्यांना ६० लाखासाठी मंजुरी द्या. पुढे जसे विषय येतील तसे हे करुन टाका.

**मुन्ना सिंग :-**

मा. सभापती साहब, जब भी खेळणी का विषय आयेगा तर उसमें बाकायदा डिटेल दो।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, प्रस्ताव ६० लाख का मंजुर किया अच्छी बात है। लेकिन अधिकारी लोगो से आग्रह है की, यह खरेदी करने में इंट्रेस्ट रहते है। खरेदी करके वह चित बच्चों के काम में आए ऐसा करना चाहिए। क्योंकी, मेरे वॉर्ड के अंदर एक प्लास्टिक का लंबा झुला और गोल गोल चढनेवाला वह दोनो पानी के टंकी वाले गार्ड में रख दिए। निचे किचड रहता है, पानी रहता है। वह किचड में जाएगा। हमको खरेदी में इंट्रेस्ट या उनको बच्चे को उठाने में इंट्रेस्ट है।

**शरद पाटील :-**

आपले सगळ्या नगरसेवकांचे प्रस्ताव येतात ना ते नावानिशी द्या ना. कोण त्याला विरोध करणार? तुम्ही द्या नगरसेवकांच्या नावानिशी एवढे-एवढे वॉर्डमध्ये खेळणी पाहिजे म्हणून.

**रोहिदास पाटील :-**

हे सांगायला मला आनंद वाटत नाही. ह्यांची कार्यपध्दती कशी आहे. २ मार्चला आयुक्तांनी ह्याला परमिशन दिल. पुस्तक खरेदी करा. कोणासाठी पुस्तक आहेत जे गरजु लोक आहे. त्यांच्यासाठी आहे ना ते २ मार्चची पुस्तक अजुनही येत नाही. त्याच टेंडर काय मागवतो काय करतो? गर्व्हमेंट कडून मिळतात? कोणाकडून मिळतात? आपल्या अधिका-यांचे आपल्या चाणक्ष्याचे गुण आहेत त्याचा वापर करुन ती पुस्तक गरजवंताला द्यायला पाहिजे. ती पुस्तक नगरसेवक मागत नाही. सभापती मागत नाही. अधिकारी मागत नाही. जे गरजवंत आहे त्यांच्यासाठी मागतो. आपण फक्त माध्यम ठरतो. ही सभा माध्यम ठरते किंवा स्थायी समितीने त्याला मान्यता दिली आणि पुस्तक आली ते गरजवंत शिकतात. पण ते नाही होत. बसायला नाही मिळत वर्षभर मागवून मिळत नसेल. आणि आजच्या ठिकाणी तुम्ही एकदम मागाल. तर आम्ही देणार नाही. रात्रभर मेहनत करा. आजच्या ह्याच्यात ६० लाखात काय बसते. पुढच्या मिटींगला ६० लाख घ्या. त्याच्या पुढच्या मिटींगला ६० लाख घ्या. आपल्याला १० कोटी संपवायचे आहे ते ह्या महिन्यामध्ये संपवून टाका.

**बर्नड डिमेलो :-**

प्रकरण क्र. ९१ चा सुधारित ठरावाचे वाचन केले.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९१:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानात, मैदानात व इतर ठिकाणी नविन खेळणी, बेचेंस पुरवठा व जुनी खेळणी दुरुस्ती करणेकामी आलेल्या वार्षिक निविदांना मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ८२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानात, मैदानात व इतर ठिकाणी नविन खेळणी, बेंचेस पुरवठा व जुनी खेळणी दुरुस्ती करणेकामी मा. आयुक्त सो. यांच्या दि.१६/०५/२०१३ रोजीच्या मान्यंतेने (निविदा प्रसिध्दीस) दि.१३/०६/२०१३ रोजीच्या जाहीर निविदा सुचनेप्रमाणे दै.खबर आजतक, दै.प्रहार या वृत्तपत्रात तसेच e-Tendering प्रणालीद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेची मुदत दि.२४/०६/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत होती. त्यानुसार दि.१४/०६/२०१३ ते दि. २४/०६/२०१३ या कालावधीत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

**१. मे. अरिहंत इंडस्ट्रीयल कार्पोरेशन लि.**

**२. मे. बाबा प्ले वर्ल्ड**

**३. मे. हनी फन एन-थ्रील कंपनी**

वरीलप्रमाणे प्राप्त एकुण तीनही निविदा विहित मुदतीत व तांत्रीक दृष्टया प्राप्त झाल्या असुन सदर निविदांची Financial Bid उघडणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी दि. ०६/०७/२०१३ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार दि. ०८/०७/२०१३ रोजी सदर निविदेचे Financial Bid उघडून तुलनात्मक तक्ता / विवरणपत्र सोबत जोडले असुन त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Description of Item | ARIHANT INDUSTRIAL CORPORATION LTD. | BABA PLAY WORLD | HONEY FUN N THILL CO. |
|---|---|---|---|---|
| 1. | DELUXE SLIDE (SS) | Rs.63963/- | **Rs.58900/-** | Rs.65402/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2. | TRIPLE WAVE SLIDE | Rs.2,58,000/- | **Rs.2,15,500/-** | Rs.2,63,805/- |
| 3. | WAVE SLIDE (FRP) | Rs.93,740/- | **Rs.88,500/-** | Rs.95,849/- |
| 4. | FRP Deluxe Plain Slide - 1.5 MTR | Rs.72059/- | Rs.71800/- | **Rs.70,438/-** |
| 5. | FRP Deluxe Plain Slide - 2.1 MTR. | Rs.93031/- | Rs.92500/- | **Rs.90938/-** |
| 6. | FRP Wave Slide - 1.5 MTR. | Rs.72025/- | **Rs.52900/-** | Rs.70646/- |
| 7. | CURVE SLIDE | **Rs.161788/-** | Rs.166500/- | Rs.165428/- |
| 8. | ROLLER SLIDE | Rs.77400/- | **Rs.74500/-** | Rs.79142/- |
| 9. | Roller Slide - 2.1 MTR. | Rs.111422/- | Rs.110800/- | **Rs.108915/-** |
| 10. | FRP ROLLER SLIDE – | Rs.123518/- | **Rs.120500/-** | Rs.126297/- |
| 11. | FRP Mini Wave Slide - 0.9 MTR. | Rs.26875/- | **Rs.25200/-** | Rs.26180/- |
| 12. | FRP Spiral Slide - 1.5 MTR | Rs.179609/- | **Rs.175200/-** | Rs.177210/- |
| 13. | FRP Spiral Slide - 2.1 MTR | Rs.226608/- | Rs.223500/- | **Rs.221509/-** |
| 14. | FRP Mini Tube Slide - 1.5 MTR. | Rs.174016/- | Rs.171800/- | **Rs.170101/-** |
| 15. | DOUBLE ARCH SWING | Rs.51063/- | **Rs.46200/-** | Rs.52211/- |
| 16. | Double Swing - ECO | Rs.37238/- | Rs.37900/- | **Rs.36400/-** |
| 17. | Double Toddler Swing | Rs.35169/- | Rs.35900/- | **Rs.34378/-** |
| 18. | DELUXE SWING | Rs.62000/- | **Rs.55200/-** | Rs.63395/- |
| 19. | GARDEN SWING | Rs.68724/- | Rs.68900/- | **Rs.67178/-** |
| 20. | Three In One | Rs.33125/- | Rs.33800/- | **Rs.32380/-** |
| 21. | Four In One | Rs.43215/- | **Rs.38900/-** | Rs.44187/- |
| 22. | Four Seat Arch Swing | Rs.97750/- | Rs.96900/- | **Rs.95551/-** |
| 23. | Cross - N – Zero | Rs.12470/- | Rs.12900/- | **Rs.12189/-** |
| 24. | TWINDLER GO ROUND | **Rs.66543/-** | Rs.68900/- | Rs.68040/- |
| 25. | Platform MGR FRP Top | Rs.78942/- | Rs.79200/- | **Rs.77166/-** |
| 26. | Platform MGR Metal Top | Rs.60000/- | Rs.59800/- | **Rs.58650/-** |
| 27. | ANIMAL MERRY GO ROUND | Rs.67050/- | **Rs.55900/-** | Rs.65575/- |
| 28. | Four seat MGR | **Rs.51574/-** | Rs.52100/- | Rs.52761/- |
| 29. | STANDARD SEE-SAW | Rs.13975/- | **Rs.11900/-** | Rs.14289/- |
| 30. | MULTI SEATER SEE - SAW | Rs.26338/- | **Rs.24800/-** | Rs.26930/- |
| 31. | Double See Saw | Rs.26350/- | Rs.26900/- | **Rs.25757/-** |
| 32. | A TO B | **Rs.36550/-** | Rs.36600/- | Rs.37372/- |
| 33. | WALKING BARREL | Rs.37500/- | Rs.37900/- | **Rs.36656/-** |
| 34. | CIRCULAR SWING | Rs.46978/- | **Rs.42800/-** | Rs.48034/- |
| 35. | SKY ROCKER | **Rs.24403/-** | Rs.25900/- | Rs.24952/- |
| 36. | Balancing Bridge | Rs.71000/- | Rs.70900/- | **Rs.69403/-** |
| 37. | Crystal Maze | Rs.59000/- | Rs.58900/- | **Rs.57673/-** |
| 38. | Criss Cross Climber | Rs.46548/- | **Rs.45800/-** | Rs.47595/- |
| 39. | Loop Climber | Rs.36980/- | **Rs.35900/-** | Rs.36148/- |
| 40. | TURBO TOWER | Rs.49354/- | Rs.50900/- | **Rs.48268/-** |
| 41. | S Bridge Climber | Rs.46500/- | Rs.49000/- | **Rs.45454/-** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 42. | Twin Climber | Rs.18490/- | Rs.18200/- | **Rs.18074/-** |
| 43. | TWISTED CLIMBER | **Rs.92450/-** | Rs.96800/- | Rs.94530/- |
| 44. | SATELLITE SCRAMBLER | Rs.70128/- | Rs.69800/- | **Rs.68585/-** |
| 45. | DOUBLE BAR | Rs.14500/- | Rs.14300/- | **Rs.14174/-** |
| 46. | LOOP RUNG | Rs.36980/- | **Rs.35200/-** | Rs.37812/- |
| 47. | TODDLER SWING | Rs.35153/- | **Rs.34200/-** | Rs.35943/- |
| 48. | ROCKING BOAT | Rs.14513/- | Rs.14200/- | **Rs.14186/-** |
| 49. | SPRING RIDER : BIKE | Rs.25800/- | **Rs.24500/-** | Rs.26381/- |
| 50. | SPRING RIDER : JUMBO | Rs.29025/- | **Rs.28500/-** | Rs.29678/- |
| 51. | Spring Rider | Rs.19200/- | Rs.19100/- | **Rs.18768/-** |
| 52. | SPRING RIDER SHARK | **Rs.28054/-** | Rs.28500/- | Rs.28700/- |
| 53. | SPRING RIDER RACER | **Rs.28703/-** | Rs.28800/- | Rs.29348/- |
| 54. | SPRING RIDER SCOOTY | **Rs.28703/-** | Rs.28900/- | Rs.29348/- |
| 55. | SPRING RIDER AEROPLAIN | **Rs.26375/-** | Rs.27500/- | **Rs.26375/-** |
| 56. | VIP BENCH | Rs.31068/- | **Rs.27900/-** | Rs.31767/- |
| 57. | STADIUM BENCH(FRP) | Rs.23865/- | **Rs.22200/-** | Rs.24402/- |
| 58. | Deluxe Bench | Rs.21000/- | Rs.21500/- | **Rs.20528/-** |
| 59. | Deluxe Bench FRP | Rs.22800/- | Rs.23900/- | **Rs.22287/-** |
| 60. | Blossom Bench | Rs.24000/- | Rs.23900/- | **Rs.23460/-** |
| 61. | Plank Bench FRP | Rs.23000/- | Rs.22800/- | **Rs.22483/-** |
| 62. | Standard Bench | Rs.10858/- | **Rs.9900/-** | Rs.11102/- |
| 63. | Dustbin SS | Rs.11610/- | **Rs.9800/-** | Rs.10880/- |
| 64. | Cartoon Bin | Rs.14200/- | Rs.14500/- | **Rs.13881/-** |
| 65. | NET ROCK SCRAMBLER | Rs.59878/- | **Rs.51000/-** | Rs.61225/- |
| 66. | Net Rock Climber - 2.1 MTR | Rs.58400/- | Rs.58100/- | **Rs.57086/-** |
| 67. | Multi Activity Play System : MAPS 06 | Rs.670800/- | **Rs.660000/-** | Rs.685893/- |
| 68. | Multi Activity Play System : MAPS 07 | Rs.435375/- | **Rs.428000/-** | Rs.445171/- |
| 69. | Multi Activity Play System : MAPS 12 | Rs.288100/- | **Rs.225500/-** | Rs.294582/- |
| 70. | Multi Activity Play System : MAPS 25 | Rs.805175/- | **Rs.775000/-** | Rs.853291/- |
| 71. | Multi Activity Play System : THEME 06 | **Rs.801950/-** | Rs.850000/- | Rs.819994/- |
| 72. | Multi Activity Play System : THEME 19 | Rs.672950/- | Rs.680000/- | **Rs.657809/-** |
| 73. | Multi Activity Play System : THEME 22 | **Rs.638550/-** | Rs.645000/- | Rs.652917/- |
| 74. | MPPS-12 | Rs.671000/- | Rs.661800/- | **Rs.655903/-** |
| 75. | MPPS-17 | Rs.1160000/- | Rs.1155000/- | **Rs.1133900/-** |
| 76. | MPPS-36 | Rs.610000/- | Rs.605000/- | **Rs.596275/-** |
| 77. | MPPS-44 | Rs.820000/- | Rs.818900/- | **Rs.801550/-** |

## FOR PLAY GROUND EQUIPMENT REPAIRING, FITTHING OF SPARE PARTS ,& PAINTING

| S. N. | ITEM | DESCRIPTION | ARIHANT INDUSTRIAL CORPORATION LTD. | BABA PLAY WORLD | HONEY FUN N THILL CO. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | SWING | "S" HOOK & CLAMP / BEARING | 2881 | **2450** | 5953 |
| 2. | | BELT ASSEMBLY WITH CHAIN | 8946 | **8750** | 9170 |
| 3. | | BELT SEET WITH HOOK | 4345 | **4250** | 4454 |
| 4. | | BUCKET ATTACHMENT | 8051 | **7800** | 8253 |
| 5. | DELUXE SWING | PVC SHEET | 5802 | **4200** | 5947 |
| 6. | | SEAT ASSLY.WITH CHAIN & BEARING | 20768 | **18500** | 19200 |
| 7. | CIRCULAR SWING | BEARING SET | 12358 | **9800** | 10900 |
| 8. | | ROTO SEAT | 3834 | **2500** | 3600 |
| 9. | STD , SEE SAW | SEAT WITH HANDLE ETC. | 3527 | 3500 | **3439** |
| 10. | MULTY | SEESAW LEVER SEAT | 12397 | **10500** | 12707 |
| | | **MERRY GO ROUND** | | | |
| 11. | MERRY GO ROUND | BEARING SHAFT | 20857 | **18500** | 21378 |
| 12. | | MGRP CHECKER PLATE SET | 38621 | **28900** | 37656 |
| 13. | | CHAIR SEAT & ANIMAL FRP | 12968 | **10900** | 12652 |
| | | **CLIMBER** | | | |
| 14. | CLIMBER | CRYSTAL MAZE / SUNSET PIPES/ PLATES | 1386 | **950** | 1346 |
| 15. | SATTELITE | CHAIN LADDER | 57151 | **4800** | 5607 |
| 16. | ALL NET CLIMBER | P. P. ROPE PER METER | 405 | **380** | 450 |
| 17. | | P. P. ROPE CLAMPS | 697 | **550** | 750 |
| | | **SLIDES** | | | |
| 18. | SLIDES | TRIANGLE STEPS | 1300 | **900** | 1390 |
| 19. | | PLATFORM | 5316 | **4500** | 5500 |
| 20. | | LADDER FRAME (7') | 5800 | **4900** | 5850 |
| 21. | WAVE SLIDE | SLIDING CHUTE 5' HT (FRP) | 47158 | **35900** | 48337 |
| 22. | | SLIDING CHUTE 7' HT (FRP) | 59810 | **42900** | 61306 |
| 23. | DELUXE SLIDE | SLIDING CHUTE 5' HT ( S.S. 16 GUAGE ) | 46008 | **38900** | 45650 |
| 24. | | SLIDING CHUTE 7' HT ( S.S. 16 GUAGE ) | 57150 | **48900** | 58948 |
| 25. | ROLLER | ROLLER | 1470 | **1200** | 1506 |
| 26. | | PIPE & PIN | 486 | **350** | 498 |
| 27. | TUBE SLIDE | SLIDING MODULE | 101409 | **75900** | 98874 |
| 28. | | LANDING MODULE | 41024 | **25900** | 39998 |
| 29. | SPIRAL SLIDE | SLIDING CHUTE 5' HT | 155219 | **95800** | 151339 |
| 30. | | SLIDING CHUTE 7' HT | 230040 | **185000** | 224289 |
| 31. | | SLIDING CHUTE 10' HT | 255000 | **210000** | 248625 |
| 32. | ALL FRP SLIDE | GEL COATING | 57114 | **48900** | 55686 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 33. | E BENCH | STRIPS FOR SEAT | 2300 | **1800** | 2358 |
| 34. | VIP BENCH | STRIPS FOR SEAT (FRP) | 4601 | **2100** | 4486 |
| 35. | BALANC. BRIDGE | P.P. ROPE WITH CLAMPS | 9968 | **7500** | 9719 |
| 36. | | WIRE ROPE | 9674 | **5800** | 9433 |
| 37. | | ROTO FLOATS | 8243 | **5900** | 8037 |
| 38. | | D' SHACKLES 3/4" | 1099 | **800** | 1072 |
| 39. | SWINGING BRIDGE | WOODEN /FRP/ROTO PLANK | 3451 | **2900** | 3537 |
| 40. | ROLLING BARREL | ROLLER SET | 64000 | **55000** | 62400 |
| 41. | WALK. BARREL | ROTO DRUM | 12141 | **9800** | 11837 |
| 42. | | BEARING ASSLY | 8964 | **5500** | 8722 |
| 43. | CROSS & ZERO | X' & '0 ' BOX | 959 | **750** | 982 |
| | | **KIDDIES RANGE** | | | |
| 44. | COMBINATION | ROTTO/FRP SLIDE | 17253 | **12500** | 16822 |
| 45. | | BUCKET ASSEMBLY | 3246 | **2800** | 3165 |
| 46. | SET | SEE SAW (BABY SEAT) | 1789 | **1250** | 1744 |
| 47. | SPRING RIDER | DUCK /WHALE/PONY | 12269 | **7900** | 12576 |
| 48. | | STAND | 4831 | **3500** | 4952 |
| 49. | | SPRING | 11200 | **5900** | 11480 |
| 50. | | PEDDLE | 1406 | **1100** | 1441 |
| 51. | MPPS | ROTO RAILING | 21023 | **12900** | 21549 |
| 52. | | SWINING BRIDGE 2.4/1.8 MLG | 76362 | **45900** | 74500 |
| 53. | | PLAIN BRIDGE 2.4/1.8 MLG | 83025 | **47900** | 81000 |
| 54. | | SQUARE DECK PLATFORM | 34506 | **15900** | 32500 |
| 55. | | FRP CANOPY PART | 12777 | **9900** | 12200 |
| 56. | | HEXAGONAL DECK PLATFORM | 47158 | **24900** | 43500 |
| 57. | | SWINGING BRIDGE CHAIN | 7063 | **5900** | 6850 |
| 58. | | MAPS NYLON CLAMP | 959 | **750** | 950 |
| 59. | | MPPS DECK HANDLE | 980 | **850** | 970 |
| 60. | | ALUMINIUM CHERKED PLATE9.3 X 32 | 21200 | **12900** | 21730 |
| 61. | | TUBE SLIDE TOP COVER | 49413 | **32900** | 48177 |
| 62. | | SPIRAL CLIMBER | 19170 | **18900** | **18900** |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता नविन खेळणी व बेचेंस पुरवठा करणेकामी **अरिहंत इन्डस्ट्रीयल कार्पोरेशन लि. यांचे अनु.क्र.**७,२४,२८,३२,३५,४३,५२,५३,५४,५५,७१ व ७३, **बाबा प्ले वर्ल्ड यांचे अनु.क्र.** १,२,३,६,८,१०,११,१२,१५,१८,२१,२७,२९,३०,३४,३८,३९,४६, ४७,४९,५०,५६,५७,६२,६३,६५,६७,६८,६९ व ७०, **हनी फन एन थ्रील कंपनी अनु. क्र.**४,५, ९,१३,१४,१६,१७,१९,२०,२२,२३,२५,२६, ३१,३३,३६,३७,४०,४१,४२,४४,४५,४८,५१,५५,५८,५९,६०,६१,६४,६६,७२,७४,७५,७६ व ७७ या कंपन्यांचे निविदेतील दर कमी असल्याचे दिसून आले. त्याचबरोबर **अरिहंत इंडस्ट्रियल कॉर्पोरेशनचे लि.** यांचे व **हनी फन-एन-थ्रील कं.** यांचे अ.क्र.५५ चे निविदेतील दर **सारखेच** असल्याचे दिसून येते.

तसेच खेळणी दुरुस्ती बाबतचे **बाबा प्ले वर्ल्ड** यांचे अ.क्र.१,२,३,४,५,६,७,८,१०,११, १२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४१,४२, ४३,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५१,५२,५३,५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६१ व ६२ व **हनी फन-एन-थ्रील कंपनी** यांचे

अ.क्र.९ चे निविदेतील दर कमी असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर **बाबा प्ले वर्ल्ड** व **हनी फन-एन-थ्रील कं.** यांचे अ.क्र.६२ चे निविदेतील दर <u>**सारखेच**</u> असल्याचे दिसून येते.

परंतु सदर कामी आलेल्या कमी दराच्या निविदेतील **बाबा प्ले वर्ल्ड** यांनी दि.२०/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये नविन खेळणी पुरवठा करणेकामी सद्यस्थितीत आमच्या कंपनीची आर्थिक बाजु ठिक नसल्याने व शासनाचे कर जास्त असल्याने नविन खेळणी पुरवठा करु शकणार नाही असे कळविले आहे. त्यानुसार निविदेतील क्रमांक दोनचे (**L2**) निविदाधारक **अरिहंत इन्डस्ट्रीयल कार्पोरेशन लि.** यांना मनपा/जा.क्र./वृ.प्रा/१६८/२०१३-१४ दि.२३/०७/२०१३ व **हनी फन-एन-थ्रिल कंपनी** यांना जा.क्र.मनपा/वृ.प्रा/१६९/२०१३-१४ दि.२३/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये **बाबा प्ले वर्ल्ड** यांनी सादर केलेल्या दरानुसार आपण काम करण्यास तयार असल्याबाबत पत्रव्यवहार केले असता **अरिहंत इंडस्ट्रियल कार्पोरेशन लि.** यांनी दि.२४/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये व तसेच **हनी फन-एन-थ्रिल कंपनी** यांनी सुध्दा दि.२४/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये **बाबा प्ले वर्ल्ड** यांच्या निविदेतील (**L1**) दराने काम करण्यास तयार आहेत असे कळविले आहे.

त्यानुसार **अरिहंत इंडस्ट्रियल कार्पोरेशन लि.** हे अ.क्र.१,२,३,८,१०,१५,१८,२१,२९, ३०,३४,३८,४१,४७,४९,५०,५६,५७,६२,६३,६५,६७,६८,६९ व ७० हे निविदेतील अ.क्र.२ चे (**L2**) चे निविदाकार असून ते सदरील अनुक्रमांका बाबत निविदेतील **बाबा प्ले वर्ल्ड** (**L1**) निविदाकार यांच्या दराने काम करण्यास तयार आहेत. तसेच **हनी फन-एन-थ्रील कंपनी** हे अ.क्र.६,११,१२,२७ व ३९ हे निविदेतील अ.क्र.२ चे (**L2**) चे निविदाकार असून ते सदरील अनुक्रमांका बाबत निविदेतील बाबा प्ले वर्ल्ड (**L1**) निविदाकार यांच्या दराने काम करण्यास तयार आहेत.

तरी उपरोक्त सादर प्रमाणे नविन खेळणी व बेचेंस पुरवठा करणेकामी व जुनी खेळणी दुरुस्ती करणेकामी आलेल्या कमी दराच्या निविदा स्विकारणेंस **मा. आयुक्त सो.** यांनी दि.०४/०९/२०१३ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी उद्याने/दुभाजक सुशोभिकरण करणे या लेखाशिर्षाखाली रु.१०००.०० लाख (रु.दहा कोटी मात्र) ची तरतुद केलेली आहे. तरी तरी उपरोक्त सादर प्रमाणे नविन खेळणी व बेचेंस पुरवठा करणेकामी व जुनी खेळणी दुरुस्ती करणेकामी आलेल्या वार्षिक निविदेस व त्याकामी येणाऱ्या खर्चांस मा.स्थायी समिती सभा सर्वांनुमते आर्थिक व प्रशाकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९२ भाईंदर (प.) विभागामध्ये भोला नगर, आंबेडकर नगर येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना सन २०१३-१४ अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) विभागामध्ये भोला नगर, आंबेडकर नगर परिसरात असलेली जलवाहिनी ही कमी व्यासाची व जुनी असल्यामुळे भोला नगर, आंबेडकर नगर परिसरात पाण्याची कमतरता जाणवत आहे. त्याकरिता मुख्य वितरण जलवाहिनी उत्तन मुख्य रस्त्यावरील भोला नगर शेवटपर्यंत ३५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकल्यास पाणी योग्य दाबाने व व्यवस्थित पुरवठा होण्यास मदत होईल. सदर काम करण्यास रु. ३६,०४,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

सदर काम शासनाच्या **"नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना सन २०१३-१४."** या योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करण्यास ही सभा प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, मला एक विचारायच आहे. वाकोडे साहेब, आपण तिथे नवीन पाईप लाईन टाकणार मग, जुनी काढणार की तशीच ठेवणार?

**सुरेश वाकोडे :-**

ह्याच्यासाठी आपण दलीत वस्तीमध्ये शासनाकडून निधी मिळतो. तो पाण्यासाठी आपण हा दलित वस्ती निधी घेतो. एक्जेस्टींग लाईन ही २०० ची आहे. तर ही आपण ३५० ची टाकतो. त्याच्यामध्ये त्या परिसरामध्ये

सगळीकडे पाण्याचा सुधारणा होण्यासाठी आणि आपल्या पैशामध्ये बचत होईल. जुनी पाईप लाईन काढणार नाही. ती पाईप लाईन तिथेच ठेवणार.

**शरद पाटील :-**

ती पाईप लाईन तिथेच ठेवणार म्हणजे तिला डेड करणार की चालू राहणार.

**सुरेश वाकोडे :-**

ती लाईन चालू राहणार. ही ३५० ची लाईन टाकल्यामुळे काय होणार की, आपला पाणीचा सप्लाय हा ३ तासाचा आहे तो दोन तासामध्ये असेल. एक तास आपला बचत होईल आणि ३५० लाईन टाकली तर बाकी परिसर पण भोला नगर, आंबेडकर नगरची लगतची बाब आहे तिथे पाण्या .....................

**शरद पाटील :-**

हे शासनाकडून येणार ना.

**सुरेश वाकोडे :-**

हा निधी शासनाकडून घ्यायचा.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला टेक्निकल उत्तर द्यायला नाही जमत का? त्यांनी काय मागितलेल आहे की, ३५० मिली लाईन टाकली तर जुनी लाईन कार्यान्वित राहणार की नाही?

**सुरेश वाकोडे :-**

कार्यान्वित राहणार ती.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही अस सांगायला पाहिजे की, ही मेन लाईन म्हणुन राहिल नंतर हिला अमुख ठिकाणी लूप करणार. त्या ठिकाणी झोन व्हाईज पाणी सोडल जाईल. अस सांगा ना. पण, तस तुम्ही केलेल नाही. तुम्ही उत्तनला जी पाईपलाईन टाकली. त्या जुन्या लाईन तुम्ही डेड केलेल्या आहेत. त्या तशाच आहेत. जी.आय. लाईन आहेत त्या त्याची कॉस्ट किती आहे ते माहित आहे का? त्या तुम्ही लूप केल्या नाही. वापरात आणल्या नाही. जाणुन बुजून केलेल आहे. तुमच हे ठरलेल आहे. लोकांना तुम्ही सांगुन देता नळ लागल्यावर पाणी जास्त मिळेल. कनेक्शन शिफ्ट करा. कशासाठी लोकांना तुम्ही खर्च देतात? तुम्ही जर लाईन डेव्हलप केली तर एकही कनेक्शन ट्रान्सफर करायला लागत नाही. महापालिकेला फक्त ५०० रु. मिळतात, त्या लोकांना किती रुपये खर्च होतो.

**हेलन गोविंद :-**

काका, तुम्हाला माहित आहे ग्रामपंचायत मधले ते पाईप लाईन आहेत.

**रोहिदास पाटील :-**

विषय तुमचा नाही. विषय असा आहे की, तुमच पाणी कमी पण नाही करायच आणि वाढवायच पण नाही. तुमच जस मिटरच आहे तस मिळवा. हा सिस्टमचा विषय आहे की, ती जी.आय. लाईन तुम्ही लूप केली नाही तुम्ही डेड केली. लूप का नाही केली? आता ही सांगतो. हे लूप करणार हे तुम्हाला सांगायलाच लागेल. ३५० वर २०० च्या १५० च्या लाईन लूप करण आणि झोनींग सिस्टम ने पाणी सोडणार ही ३५० ची मेन लाईनला राहिल. हे उत्तर झाल ते बरोबर आहे. ह्याला विरोध नाही करायच. पण तुम्ही काय करता ते तुम्हाला माहित नाही का? फक्त मंजुरी घेता.

**सुरेश वाकोडे :-**

हे आपण जूनी लाईन ठेवणार आहे. पण हे लूप प्रमाणे ह्याच्यामध्ये ठरलेल आहे. या ठिकाणी काय आहे आपण जे म्हणता ना तो मागचा प्रश्न आहे. तर त्या ठिकाणी आपण पाईपच बघतो. लिकेज जास्त होतो. काही ठिकाणी थिकनेस कमी झालेली आहे. ते झालच नसत सारख लिकेज होऊन सारख पाणी .....................

**रोहिदास पाटील :-**

आजपर्यंत तुमच्याकडे नळ फुटल्याच्या लाईनच्या नोंदी किती आहे ते सांगा? बिडाच्या लाईन काय थिकनेस कमी झाली?

**सुरेश वाकोडे :-**

ही लूप करणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

एक ही कनेक्शन ट्रान्सफर होणार नाही. एक रुपये कोणाला खर्च करावा. लागणार नाही अस समाधानकारक उत्तर द्या.

**बर्नड डिमेलो :-**

ते सांगितल्याप्रमाणे मला वाटत सुधारणा करावी टेक्नीकली. वाकोडे साहेब, काकांच म्हणन जे आहे ना. जे लूप केल आहे त्या लाईन बंद न करता लोकांना नागरिकांना खर्च न येता आपण दुसर काही जसे इंजिनियर टेक्नॉलॉजी नविन नविन निघालेले आहेत. त्या हिशोबाने काम केल तर नागरिकांना दुप्पट खर्च होणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्याहुन विषय गंभीर आहे हा जेव्हा ४ कि.ग्रॅ., ५ कि.ग्रॅम प्रेशरवर लाईन ज्या सेट व्हायला पाहिजे. त्याच्या टेस्टिंग प्रेशर असायला पाहिजे. एक कि.ग्रॅम प्रेशर नाही. मग लाईन फुटतात कशा? कोणत्या कंपनीचा माल वापरला?

**मा. सभापती :-**

ठराव सर्वांनमुते मंजुर करण्यात येतो.

**प्रकरण क्र. ९२ :-**

भाईंदर (प.) विभागामध्ये भोला नगर, आंबेडकर नगर येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ८३ :-**

नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना सन २०१३-१४ अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) विभागामध्ये भोला नगर, आंबेडकर नगर परिसरात असलेली जलवाहिनी ही कमी व्यासाची व जुनी असल्यामुळे भोला नगर, आंबेडकर नगर परिसरात पाण्याची कमतरता जाणवत आहे. त्याकरिता मुख्य वितरण जलवाहिनी उत्तन मुख्य रस्त्यावरील भोला नगर शेवटपर्यंत ३५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकल्यास पाणी योग्य दाबाने व व्यवस्थित पुरवठा होण्यास मदत होईल. सदर काम करण्यास रु. ३६,०४,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

सदर काम शासनाच्या **"नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना सन २०१३-१४."** या योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करण्यास ही सभा प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९३ निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

| अ. क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका शाळा क्र.१६,१७,१८,३० च्या इमारतीची दुरुस्ती करणे.**<br><br>**१.मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं**<br>२.मे. ऐश्वर्या इंटरप्रायझेस<br>३.मे. राठोड ब्रदर्स | **रु. २६,५१,५००/-**<br><br>**१३.०५%कमी दराने**<br>अंदाजपत्रकीय दराने<br>५.०१%कमी दराने | दि.१८/०७/२०१३ | दै. मुंबई लक्षव्दीप/<br>दै. मिड डे<br>दि.०७/०८/२०१३ | दि.१३/८/२०१३ |
| २ | **काशी जरीमरी तलाव ते ग्रीन व्हिलेज पर्यंत रस्त्यालगत गटार बांधणे.(नागरी दलित वस्ती सुधारणा योजना).**<br><br>**१.मे. देव इंजिनिअर्स**<br>२.मे. मुस्कान इंटरप्रायझेस<br>३.मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>४.मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | **रु. ४९,६६,०८६/-**<br><br>**१४.६८ %कमी दराने**<br>१२.३% कमी दराने<br>१३.२% कमी दराने<br>१४.५२% कमी दराने | दि. १९/०३/२०१३ | दै.आफटरनुन/<br>दै.संध्यानंद<br>दि.२६/०७/२०१३ | दि३०/०७/२०१३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ५.मे. इंद्रा कंन्स्ट्रक्शन कं<br>६.मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>७.मे. ई.एस.बी. इंटरप्रायझेस<br>८.मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं. | १३.५% कमी दराने<br>१२.७% कमी दराने<br>१३.८८% कमी दराने<br>९.९९% कमी दराने | | | |

अ.क्र. १ च्या कामी **मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं** यांची **१३.०५% दराची निविदा व** अ. क्र. २ च्या कामी **मे. देव इंजिनिअर्स** यांची **१४.६८ % दराची** निविदा हया सर्वात कमी दराच्या आहेत. सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वांनमुते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९३ :-**

निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ८४ :-**

| अ. क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका शाळा क्र.१६,१७,१८,३० च्या इमारतीची दुरुस्ती करणे.**<br><br>**१.मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं**<br>२.मे. ऐश्वर्या इंटरप्रायझेस<br>३.मे. राठोड ब्रदर्स | **रु. २६,५१,५००/-**<br><br>**१३.०५%कमी दराने**<br>अंदाजपत्रकीय दराने<br>५.०१%कमी दराने | दि.१८/०७/२०१३ | दै. मुंबई लक्षव्दीप/<br>दै. मिड डे<br>दि.०७/०८/२०१३ | दि.१३/८/२०१३ |
| २ | **काशी जरीमरी तलाव ते ग्रीन व्हिलेज पर्यंत रस्त्यालगत गटार बांधणे.(नागरी दलित वस्ती सुधारणा योजना).**<br><br>**१.मे. देव इंजिनिअर्स**<br>२.मे. मुस्कान इंटरप्रायझेस<br>३.मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>४.मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>५.मे. इंद्रा कंन्स्ट्रक्शन कं<br>६.मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>७.मे. ई.एस.बी. इंटरप्रायझेस<br>८.मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं. | **रु. ४९,६६,०८६/-**<br><br>**१४.६८ %कमी दराने**<br>१२.३% कमी दराने<br>१३.२% कमी दराने<br>१४.५२% कमी दराने<br>१३.५% कमी दराने<br>१२.७% कमी दराने<br>१३.८८% कमी दराने<br>९.९९% कमी दराने | दि. १९/०३/२०१३ | दै.आफटरनुन/<br>दै.संध्यानंद<br>दि.२६/०७/२०१३ | दि३०/०७/२०१३ |

अ.क्र. १ च्या कामी **मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं** यांची **१३.०५% दराची निविदा व** अ. क्र. २ च्या कामी **मे. देव इंजिनिअर्स** यांची **१४.६८ % दराची** निविदा हया सर्वात कमी दराच्या आहेत. सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९४ निविदांना मंजूरी देणे. (पाणी पुरवठा विभाग)

**रोहिदास पाटील :-**

मला ह्याच्यावर विचारायचे आहे की, ज्या लाईनवर आपण कोट्यवधी रुपयांची निविदा देतो. ती लाईन कोणाच्या ताब्यात आहे?

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, आपण निविदा काढलेल्या आहे. त्या निविदामध्ये आपण ॲडीशनल पाणी शहरामध्ये येण्यासाठी ती पाईप लाईनच काम कराव लागणार आहे. त्यासाठी ही निविदा आहे. पण जी जुनी लाईन आहे पातलीपाड्या पासुन मिरा भाईंदर पर्यंत ती मिरा भाईंदरला टाकलेली लाईन आहे. मिरा भाईंदरच्या पातलीपाड्याची लाईन आहे ती. ती फक्त आपण ......................

**रोहिदास पाटील :-**

साकेतकडे करायच आहे. पंप लावायच आहे. साकेत कुठे आहे ते आपल्याला माहित आहे. तिथे पंप लावायचे. गायमुख ते चेना ही लाईन कोणाच्या ताब्यात आहे?

**सुरेश वाकोडे :-**

गायमुख ते चेना ही लाईन स्टेम च्या ताब्यामध्ये दिली आहे.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे त्याच्यावर आपण एखादी नविन लाईन टाकतो की, डेड करतो की, नविन काही करणार. त्याच्यावर स्टेमला विश्वासात आपण घेतल की नाही. माझा फक्त एवढाच प्रश्न आहे. तुम्ही दोन ओळीच पत्र लिहून त्यांना विचारल आहे का? ज्या ठिकाणी आम्ही नविन लाईन टाकतो आम्ही जोडणार ती आणि पहिली लाईन डेड करणार की चालू ठेवणार?

**सुरेश वाकोडे :-**

ह्याला स्टेम इस्टिमने सोडलेली आहे. याची कल्पना दिलेली आहे. २० लाख पाणी आपण कस घेणार. त्यांच्या मिटींगमध्ये आम्ही हा सगळा प्रस्ताव त्यांना सांगितलेला आहे. आणि हे जे साकेतचा बुस्टींग पंप आहे. त्याच्यासाठी जागा सध्या आपल्याला स्टेमने दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

साकेत बद्दल मी बोलतच नाही.

**सुरेश वाकोडे :-**

हे २० एम.एल.डी. साठी आहे. २० एम.एल.डी. च कस आहे की, त्याचा पंप बसवणार. पंपाने पाणी घेणार नंतर हे पाणी पातलीपाड्यावरुन पुढे येते. गायमुखच्या ह्याच्यामध्ये ही आपण जूनी लाईन डेड करणार नाही. जुनी लाईन चालू करणार ही लाईन त्याच्या बाजुला पॅरलल लाईन टाकणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही गायमुख हे शब्द दिले. हेच डिस्टन्स आहेत ना. पातलीपाडा नाही. साकेतला तुम्ही टाकीच्या पलीकडे तुम्ही पंप बसवणार. तिथुनी कापुर बावडी येणार. कापुर बावडी ते पातलीपाडा. पातलीपाड्यावरुन गायमुखला आल. आता गायमुख ते चेना त्या ठिकाणी प्रेशर होतच नाही ज्या ठिकाणी तुम्ही ही पाईप लाईन बदली करता. ऊंच लेव्हल आली पाईप लाईनच लोकेशन कोणत आहे. चेनाला बदली करणार, गायमुख ला बदली करणार कुठे करणार?

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आपण ह्याच डिझाईन करुन बघितल आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे डिजाईन कन्स्लटंट एजन्सीने दिलेल आहे की व्यक्तिगत आहे.

**सुरेश वाकोडे :-**

आपण ह्याच डिझाईन केल. डिझाईन आपण चेक केल. ते डिझाईन आपण एम.जी.पी. ला दाखवल. त्यांच्याकडून ही तपासुन घेतल होत की, ॲडीशनल पाणी किती येऊ शकते. शहरामध्ये आम्ही काय केल की एम.डी.आर. वगैरे मागे जेव्हा शट डाऊन होता तेव्हा फक्त मिरा भाईंदरला पाणी द्यायच. ते ही म्हटल की आपण किती ही पाणी घ्यायच तेवढ घेऊ शकतो. तर आपण त्या ठिकाणी चाचणी घेतली. एम.डी.आर. मध्ये ओपन करुन बघितल किती एम.एल.डी. पाणी जाते. तर १२० ते १२५ एम.एल.डी. पाणी जाऊ शकते. त्यापुढे पाणी जाऊच शकत नाही. जर ॲडीशन पाणी २० एम.एल.डी. आणायच असेल. तर आपल्याला काय करायला लागणार. ही पॅरलल लाईन टाकायला लागणार. पॅरलल लाईन टाकली म्हणजे ऑटोमॅटीक काय होईल ......

**रोहिदास पाटील :-**

पॅरलल लाईन टाकल म्हणजे आपल्याला पैसे खर्च करायचे. पैशाला मंजुरी द्यायची इथपर्यंत ठिक आहे. आता तुम्ही ह्या असलेल्या पाईप लाईन मधुन २० एम.एल.डी. पाणी येणार नाही अस तुमच मत आहे का?

**सुरेश वाकोडे :-**

हो नाही येणार.

**रोहिदास पाटील :-**

मग पातलीपाड्यापासून गायमुखपर्यंत पाणी येणार कसे?

**सुरेश वाकोडे :-**

काका, पातलीपाड्यातून ते गायमुख पर्यंत पाणी कसे येतं होते की, त्याच्यामधून प्रेशर लॉसेस होतात तिथपर्यंत ठिक आहे. पण पॅरलल लाईन असली तर आपण प्रेशर लॉसेस कमी करु शकतो.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही १ लाईन टाका, २ लाईन टाका, मी काही विरोध करत नाही. तुम्ही टेक्नीकल उत्तर देत नाही. पातलीपाड्यापासून ते गायमुख पर्यंत पाणी येतच नाही. जर तीच पाईप लाईन आहे. जिथे तिला कॅपेसिटी आहे आणि जिथे प्रेशर डेव्हलपच होत नाही त्याठिकाणी कॅपेसिटीचे टेक्नीकल उत्तर द्या ना.

**सुरेश वाकोडे :-**

त्याच्यामध्ये पॅरलल लाईन टाकल्यामुळे काय होते की, हे जे लॉसेस आहे ते लॉसेस कमी होतात. लॉसेस कमी करुन आपण काय करतो की, ह्याला प्रेशर हेड वाढवतो आणि ह्याला मेन्टेन करतो. त्या केसमध्ये हे २० एम.एल.डी. पाणी येवू शकते. याचा आम्ही टेक्नीकली स्टडी केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

कोणी स्टडी केलेली आहे?

**सुरेश वाकोडे :-**

मी प्रत्यक्ष स्टडी केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

ही सभा तुम्हाला चॅलेंज करते. २८ कोटी रु. या अडीच वर्षामध्ये १ एप्रिल २०११ ते ऑगस्ट २०१३ आपले ऑगस्ट २०११ ला पाणी आलेले आहे. ११० एम.एल.डी. दिवसाचे, आज ऑगस्ट २०१३ ला १२० एम.एल.डी. पाणी आलेले आहे. आपण इतका खर्च करुन, इतक्या सिस्टम बनवून आपण कुठेही ५ एम.एल.डी. पाणी वाढवू शकलो नाही. हे लक्षात घ्या. आपण २० ते ३० कोटी रु. खर्च करतो. १-२ नाही. त्यात पाणी कुठे वाढणार आहे. पाणी येणार कोणते सोर्ससाठी आमचा प्रयत्न नाही.

**बर्नड डिमेलो :-**

काका, टप्प्याटप्प्याने कामं केली तरच होईल. एकाच ह्याच्यात पालिकेची तेवढी हे नाही. त्या टोकापासून ते ह्या टोकापर्यंत प्रत्येक गावामध्ये, प्रत्येक प्रभागामध्ये ती लाईन पसरवता नाही येणार. डिव्हाईड करुनच ती लाईनिंगच्य मार्फतच पाणी पुरवठा होईल. शहराच्या जमिनी खालून तो पाणी जाईल.

**रोहिदास पाटील :-**

आता आपल्या शहराची लोकसंख्या किती आहे?

**सुरेश वाकोडे :-**

१० लाखपर्यंत लोकसंख्या आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही प्रति दिवस किती पाणी देता?

**सुरेश वाकोडे :-**

प्रति दिवस साधारण १०० ते ११० लीटर पर्यंत पाणी देतो.

**रोहिदास पाटील :-**

१०० लीटर पकडू. तर एका दिवसात किती रिक्वायरमेंट झाली? १०० X १० लाख किती झाले?

**सुरेश वाकोडे :-**

१०० एम.एल.डी. झाली.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला किती पाणी येते? १२१ एम.एल.डी. पाणी तुम्हाला येते. तुम्ही एक दिवस आड करुन आम्हाला पाणी देता. १२१ एम.एल.डी. पाणी दुसऱ्या दिवशी जाते कुठे?

**सुरेश वाकोडे :-**

हिशोबच आहे ना. १० लाख लोकसंख्या आहे. त्याला लागणार १०० एम.एल.डी. पाणी आपण रोज सप्लाय करतो. तर त्याच्यात लॉसेस वगैरे पकडले तर १० एम.एल.डी. लॉस पकडतो.

**रोहिदास पाटील :-**

तर १२१ एम.एल.डी. पाणी दुसऱ्या दिवसाचे कुठे जाते?

**बर्नड डिमेलो :-**

काका, मला वाटते आपल्या शहराचे पॉप्युलेशन १५ लाखाच्या वर आहे. ते लोक बिना पाण्याने जगत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

एक दिवस आड करुन ११० एम.एल.डी. पाणी वाकोडे साहेब कुठे पाठवतात त्याने त्याचे उत्तर द्यावे.

**बर्नड डिमेलो :-**

पाणी पुरवठा विभागामार्फत विविध विकासकामांकरिता निविदा मागविण्यांत आलेल्या असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**१) मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त २० द.ल.ली. पाणी पुरवठा योजने अंतर्गत खालील कामाच्या निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.**

अ) **कामाचे नांव :-** साकेत संकुल ठाणे येथे मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीवरुन पाणी घेणेकरीता पंपगृहात ४२५ एच.पी.क्षमतेचा व्ही.एफ.डी. प्रणालीवर आधारित इनलाईन बुस्टर पंपाचा पुरवठा करणे, बसविणे, कार्यान्वित करणे.

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराने सादर केलेला दर | वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | २,६६,०४,६००/- | ४.५ % जास्त | ३.९०% जास्त (रु.२,७६,४२,१७९) | 1st lowest |
| २ | मे. ग्रॅव्हीट इजिनिअरींग वर्कस् | | ९.० % जास्त | - | 2 nd lowest |
| ३ | मे. अे.के. इलेक्ट्रीकल ॲण्ड वर्कस्. | | ११.५% जास्त | - | 3rd lowest |

मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९०% जास्त दराची (रू.२,७६,४२,१७९/-) निविदा वाजवी आहे.

**ब) कामाचे नांव :-** गायमुख ते चेना दरम्यान १३५० मि.मी. व्यासाची मुद्पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.

या कामाची निविदा दै. नवाकाळ व दै. मिड-डे या वृत्तपत्रात दि. १०/०७/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती, निविदा ऑनलाईन भरण्याची मुदत दि. ०५/०८/२०१३ रोजी पर्यंत होती. सदर निविदा भरण्याची मुदत तीन वेळा वाढवून अंतिम मुदत दि. १४/०८/२०१३ रोजी पर्यंत होती. या निविदेचा आर्थिक देकार दि.३०/०८/२०१३ रोजी उघडण्यात आला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे .

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराने सादर केलेला दर | वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्कायवे इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | १७,८०,५४,६७५/- | १४.८८% जास्त | | निविदाकारांने निविदा मागे घेतली |
| २ | देव इंजिनियर्स | | २३.१०% जास्त | १४.७० % जास्त (रु.२०,४२,२८,७१२) | 1st lowest |
| ३ | एस.बी. खकाळ | | ३५.००% जास्त | - | 2 nd lowest |
| ४ | सुरिंद्रा इंजिनिअरींग कं. लि. | | ५०.५५% जास्त | - | 3rd lowest |
| ५ | परपेक्ट इंजिनिअरींग असोसियटस् प्रायव्हेट लि. | | ६०.००% जास्त | - | 4th lowest |

वरीलपैकी मे. स्कायवे इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांनी त्यांची निविदा मागे घेतलेली असल्यामुळे त्यांच्या निविदेची इसारा रक्कम निविदेतील अटीशर्तीनुसार जप्त करण्यात येऊन मे. स्कायवे इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची निविदा रद्द करण्यात आली. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे बोलीदार मे. देव इंजिनियर्स यांना वाटाघाटी करणेकरिता बोलाविण्यात आले. वाटाघाटी अंती त्यांनी त्यांचे दर कमी केलेले असून कमी करण्यात आलेले दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्तीचे (रू.२०,४२,२८,७१२/-) आहेत.

मृदू पोलादी प्लेट व डांबराच्या दरामध्ये वाढ झालेली आहे. सदर निविदेमध्ये मृदू पोलादी पाईपसाठी लागणारे M.S.Plate व रस्ता पुर्नबांधणी करता लागणाऱ्या डांबराचा सदयाचा बाजारात असलेला दर सरकारी कंपनी भारत पेट्रोलिअम कॉपोरेशन लि. कडून मागविण्यात येऊन त्यानुसार सदर बाबीचे दर पृथ्थकरणात करण्यात आले आहे. सद्यस्थितीत बाजारात स्टील, सिमेंट व इतर बांधकाम साहित्याच्या दरात वाढ झालेली आहे. चालू दरसुची सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकातील उपरोक्त बाबींचे क्च्ड तयार केल्यापासून आजपर्यंत झालेली

दरामधील वाढीचे दर पृथक्करण केले असता. सदर कामाचे अंदाजपत्रकीय किंमत रु. १९,७२,६९,७८८/- (निविदेतील अंदाजपत्रकीय किंमतीच्या १०.७९ % जादा दराने) येत आहे.

त्यामुळे मे. देव इंजिनियर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा वाजवी आहे.

**क) कामाचे नांव :-** हटकेश ते शामराव विठ्ठल बँकेपर्यंत १०६७ मि.मी. व्यासाची मुद्पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.

या कामाची निविदा दै. नवाकाळ व दै. मिड-डे या वृत्तपत्रात दि. १०/०७/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती, निविदा ऑनलाईन भरण्याची मुदत दि. ०५/०८/२०१३ रोजी होती. सदर निविदा भरण्याची मुदत तीन वेळा वाढवून अंतिम मुदत दि. १४/०८/२०१३ रोजी पर्यंत होती. सदर मुदतीत सहा निविदाकारांनी निविदा दाखल केल्या होत्या. त्यापैकी मे. एम.टी.फड व मे. श्री अनुकुल इन्डस्ट्रीज प्रा.लि. यांनी निविदा मागे घेतल्यामुळे त्यांच्या निविदेची इसारा रक्कम निविदेतील अटीशर्ती नुसार जप्त करण्यात येऊन उर्वरीत ४ निविदाकाराचे आर्थिक देकार दि.०५/०९/२०१३ रोजी उघडण्यात आले. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराने सादर केलेला दर | वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | एस.बी. खकाळ | ६,०३,६७,२१६/- | २९.००% जास्त | १४.७० % जास्त (रु.६,९२,४१,१९७) | 1st lowest |
| २ | देव इंजिनियर्स | | ३५.००% जास्त | - | 2 nd lowest |
| ३ | सुरिंद्रा इंजिनिअरींग कं. लि. | | ५०.५५% जास्त | - | 3rd lowest |
| ४ | परपेक्ट इंजिनिअरींग असोसियटस् प्रायव्हेट लि. | | ६०.००% जास्त | | 4th lowest |

मे. एस.बी. खकाळ यांचा देकार लघुत्तम असून त्यांना दर वाटाघाटी करणेकरिता बोलाविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचे दर कमी करुन वाटाघाटी अंतिम त्यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्त दराची (रु.६,९२,४१,१९७/-) आहे.

मृदू पोलादी प्लेट व डांबराच्या दरामध्ये वाढ झालेली आहे. सदर निविदेमध्ये मृदू पोलादी पाईपसाठी लागणारे M.S.Plate व रस्ता पुर्नबांधणी करता लागणाऱ्या डांबराचा सदयाचा बाजारात असलेला दर सरकारी कंपनी भारत पेट्रोलिअम कॉपोरेशन लि. कडून मागविण्यात येऊन त्यानुसार सदर बाबीचे दर पृथकरणात करण्यात आले आहे. सद्यस्थितीत बाजारात स्टील, सिमेंट व इतर बांधकाम साहित्याच्या दरात वाढ झालेली आहे. चालू दरसुची सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकातील उपरोक्त बाबींचे क्ल्ड तयार केल्यापासून आजपर्यंत झालेली दरामधील वाढीचे दर पृथक्करण केले असता. सदर कामाचे अंदाजपत्रकीय किंमत रु. ६,६९,४८,९७५/- (निविदेतील अंदाजपत्रकीय किंमतीच्या १०.९० % जादा दराने) येत आहे.

मे. एस.बी. खकाळ यांचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा वाजवी आहे.

## २) ५० द.ल.ली. योजने अंतर्गत उर्वरित कामे.

**ड) कामाचे नांव :-** ५० द.ल.ली. योजने अंतर्गत मिरा भाईंदर क्षेत्रात खालील ठिकाणी जलकुंभ, साठवण टाकी व एम.बी.आर. बांधणेचे संकल्पन व संकल्पचित्र तयार करणे, बांधणे व कार्यान्वित करणे. सुभाष मैदान सर्व्हे क्र. ७७७ येथे १ द.ल.ली. क्षमतेचा जलकुंभ बांधणे, डोंगरी येथे ०.९० द.ल.ली. क्षमतेची साठवण टाकी बांधणे व डोंगरी येथे ०.७६ द.ल.ली. क्षमतेचा एम.बी.आर. बांधणे.

**५० द.ल.ली. योजनेतील उर्वरित कामातंर्गत अपुर्ण राहिलेल्या कामाकरिता निविदा मागविण्यात आलेली होती. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराने सादर केलेला दर | वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | संदेश डी. बुटाला | २,४१,९५,८००/- | २२.५०% जास्त | १३.८६ % जास्त (रु.२,७५,४९,३३८) | 1st lowest |
| २ | मे. एस.बी. खकाळ | | २३.४०% जास्त | - | 2 nd lowest |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि | | २५.००% जास्त | - | 3rd lowest |

सदर अंदाजपत्रकातील दर हे सन २०११-१२ च्या दरसुचीवरती आहेत. सद्यस्थितीत बाजारात स्टील, सिमेंट व इतर बांधकाम साहित्याच्या दरात वाढ झालेली आहे. त्यामुळे संदेश डी. बुटाला यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८६% जास्त (रू.२,७५,४९,३३८/-) दराची निविदा वाजवी आहे.

अनुक्रमांक. **अ) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९०% जास्त दराची (रू.२,७६,४२,१७९/-) आहे. अनुक्रमांक **ब) देव इंजिनियर्स** यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्त दराची (रू.२०,४२,२८,७१२/-) आहे व अनुक्रमांक **क) एस.बी. खकाळ** यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्त दराची (रू.६,९२,४१,१९७/-) आहे.अनुक्रमांक **ड) संदेश डी. बुटाला** यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८६% जास्त दराची (रू.२,७५,४९,३३८/-) आहे. यांचे निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मुन्ना सिंग :-**

मा. सभापती साहब, वाकोडे साहब को पानी का खुलासा करने के लिए बोलिए। हमारे भाईंदर ईस्ट मे पुरे विभाग मे पानी का तकलीफ है। वाकोडे साहबने सर्व्हे किया है और बोले थे की, २-४ दिन मे कुछ करता हूॅ तो उसका भी अभी खुलासा कर दिजीए।

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. मिरा भाईंदर शहरामध्ये आताच्या लोकसंख्येप्रमाणे पाणी १३५ ते १५० एम.एल.डी. पाण्याची आवश्यकता आहे. पण आपल्या शहरामध्ये ३५ एम.एल.डी. पाणी शॉर्ट येते. ३५ एम.एल.डी. पाणी शॉर्ट येत असल्यामुळे आपण नियोजन प्रॉप्ट करुन डिस्ट्रीब्युट करतो. त्याच्यामध्ये काही झोन आहेत. त्यातले काही झोन हे २४ तासावर असतात. मिरारोडचे काही भाग आपले ३६ तासावर आहेत. भाईंदर वेस्ट आहे ते ४५ तासावर आहे. आणि नवघर पट्टा हा ४५ ते ४८ तासावर सप्लाय होतो.

**रोहिदास पाटील :-**

खरं रिपोर्टींग करा, जे तुम्ही देत नाही. ते तुम्हाला देणे शक्यही नाही. पण, आमच्या येथे कोणत्याही दिवशी ४८ तासाच्या आधी पाणी आलेच नाही. ४८ ते ५८ तासांवर, आजचे पाणी तर ५८ तासाने आले.

**सुरेश वाकोडे :-**

काका, ज्यावेळेला प्रॉब्लम असतो त्या वेळेला प्रॉब्लम येतो. ह्या दोन दिवसामध्ये १ तास लाईट गेली होती. तरी आम्ही त्यावेळेला कालच्या परिस्थितीमध्ये टी.एम.सी. चे पाणी बंद करुन आपला सप्लाय लवकर चालु करुन घेतला ह्या एका तासामध्ये. जनरली लाईट गेल्यानंतर ३ तास लागतात.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही चांगला प्रयत्न केला तर आम्ही धन्यवाद देणारच.

**बर्नड डिमेलो :-**

वाकोडे साहेब आता तुम्ही जशी मागणी करता तशी स्थायी समिती आपल्याला सहकार्य करत आहे आणि करत राहील. त्यांचा बोलायचा उद्देश हा आहे की, ४८ ते ५८ तासावर आहेत ते २८ तासावर कधी आणणार आणि तुम्ही एवढा खर्च करुन डायरेक्ट रिझर्ल्ट नागरीकांना दिला पाहिजे. तर तुम्ही जागृतपणे काम करा आणि लवकरात लवकर..............

**सुरेश वाकोडे :-**

ईस्टमध्ये मी प्रत्यक्ष येवून त्याठिकाणी सर्व्हे केला. १-२ ठिकाणी सुधारणा करावी लागणार आहे. तर ह्या ८ दिवसामध्ये सुधारणा करुन पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा आणू.

**शरद पाटील :-**

वाकोडे साहेब, नागरीकांच्या आता एवढ्या तिव्र भावना आहेत ना. म्हणजे लोक बाहेर निघायला तयार झालेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

माझा टेक्नीकल प्रश्न आहे. त्यांनी सांगितले शहराची लोकसंख्या १० लाख, त्यांनी सांगितले पर.........

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्याकडे ज्या त्रुट्या आहेत त्या मी तुमच्या लक्षात आणतो. त्यांचा हेतु काय आहे ते माझ्या लक्षात येत नाही आणि ज्यावेळी ११० एम.एल.डी. पाणी एक दिवस आड करुन मिळते. मग ते पाणी वाया जाते. वाया कुठे जाते किंवा कसे डिस्ट्रीब्युट होते ती सिस्टम त्यांना माहित नाही. या शहरामध्ये किती किती पाईप लाईन, किती क्षमतेच्या आहेत? ३५० च्या किती आहेत? ४०० च्या किती आहेत? २५० च्या किती आहेत?

तो नकाशा त्यांच्याकडे नाही. त्यांच्याकडे झोन सिस्टममध्ये कोणत्या झोनला किती पाणी दिले जाते त्याची कोणती ही नोंद नाही, क्वांटीटी नाही. किती ठिकाणी किती प्रेशर येते. कुठेही प्रेशर मोजले, ह्या सिस्टम आहेत आणि ह्या पालिकांना त्यांनी आजपर्यंत कोणत्याही एजन्सीचा प्रामाणिक सल्ला घ्यायचा प्रयत्न केला नाही. ३०-३० कोटीची योजना एक एक्झीकेटीव्ह देतात.

**सुरेश वाकोडे :-**

आपण शहरामध्ये २४ तास पाण्याचा प्रेशर माजतो. आपण चेण्याला कन्टीन्यु अर्धा तासाने एक तासाने रिडींग घेत असतो. पाणी किती येते, फ्लो काय आहे? रात्री बारा वाजता फोन आला तर मी इथुन डायरेक्ट फोन करतो. इथपर्यंत आपण सेटल केलेले आहे. अटकल आपण प्रेशर ठेवलेले आहे. त्या ठिकाणी प्रेशर २.६, २.९ आहे की नाही हे आपण सारखे तपासत असतो. आपण कमला पार्क टाकीला मिटर बसवतो आणि त्या मिटर प्रमाणे किती पाणी एम.एल.डी. गेले त्याचा रिपोर्ट दररोज माझ्याजवळ असतो. गोडदेव टाकीला किती पाणी आले ह्याचे रिडींग असते. नवघर टाकीची रिडींग आमच्याकडे असते. इथपर्यंत आमच्याकडे रिडींग आहे. प्रत्येक झोनचा आमच्याकडे नकाश आहे. ज्यांना तो नकाशा पाहिजे त्यांना मी देतो. काका, आपण मिरा भाईंदरची सिस्टम एवढी चांगली केलेली आहे. महाराष्ट्रामध्ये सगळ्यात नंबर वनची सिस्टम म्हणून आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेला मागच्या वर्षी संत गाडगेबाबामध्ये पुरस्कार मिळाला होता. कारण त्यांनी आपले लिकेजेस चेक केले. आपण पाणी किती घेतो आणि त्या पाण्याचा वापर किती करतो हे कॅलक्युलेशन त्यांनी आपले तपासले आणि त्यांना ते पटलेले आहे. सगळ्यात कमी लॉस असेल महाराष्ट्रामध्ये तर तो मिरा भाईंदरचा.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, मला परिवहन ह्या विषयावर थोडे बोलायचे आहे. कारण आमच्या उत्तनच्या लोकांना जास्त प्रवास आहे आणि त्याचा फक्त आमच्या गावामध्ये आणि सदस्य, उत्तनचे सर्व नगरसेवक जागोजागी प्रत्येकांच्या बैठका चालु आहेत. बस स्टॅन्डवर कामगार लोकांचे, विद्यार्थ्यांचे सर्वांची पत्रे आलेली आहेत. २-४ दिवसात मला तर वाटते उद्रेक वाढेल. मी आता अर्ज दिला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन विभागाने अचानक केलेल्या दरवाढीबाबत. तर आपल्या कोणत्या स्थायी समितीमध्ये, मा. महासभेमध्ये चर्चा न करता अचानकपणे भाडेवाढ करण्यात आलेली आहे. तर त्याला महादरवाढ म्हणतात. ३१ ते ३५ टक्के दरवाढ झालेली आहे.

**प्रविण पाटील :-**

भाडेवाढीबाबत आमचा विरोध आहे. ‘‘ज’’ खाली प्रस्ताव घ्या.

**राजेश वेतोसकर :-**

मा. सभापती साहेब, हा धोरणात्मक निर्णय आहे. हा मा. महासभेपुढे यायला पाहिजे होता.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही इथे थोडेसे लक्ष द्या. कारण वसई-विरारमध्ये बसेस तोडण्यात आलेल्या आहेत. तो प्रकार आपल्या मिरा भाईंदरमध्ये घडू नये आणि त्या भाडेवाढीमुळे फुकट नुकसान होईल, असा प्रकार होऊ नये.

**भरत शितोळे (मा. अतिरिक्त आयुक्त) :-**

माहिती घेऊन सांगतो. ही भाडेवाढ जी आहे, तो प्रस्ताव आहे तो शासन स्तरावर ट्रान्सपोर्ट कमिशनरकडे आहे.

**बर्नड डिमेलो :-**

दरवाढ व्हायला पाहिजे. आम्ही त्याच्याबद्दल हे नाही पण कितपर्यंत?

**हेलन गोविंद :-**

सर, डायरेक्ट चार रुपये वाढवले. दरवाढ व्हायला पाहिजे पण एकदम चार रुपये वाढवले ना. दरवर्षी नाही वाढवले म्हणून चार रुपये वाढवायचे का डायरेक्ट?

**भरत शितोळे (मा. अतिरिक्त आयुक्त) :-**

ही शासनाने मान्यता दिली आहे. पण आपण तेवढी भाडेवाढ केलेली नाही. त्याचा मध्य काढून आपण कमी वाढवली आहे. मी महापौर मॅडमशी चर्चा केलेली आहे. तर आपण १०० टक्के वाढ केलेली नाही. अदरवाईज तो कॉन्ट्रॅक्टर आहे ना ते आपण १०० वाढ केलेली नाही.

**बर्नड डिमेलो :-**

तुम्ही एस.टी. महामंडळाचा दर काढला त्याच्यामध्ये भरपुर फरक आहे. साहेब २ रु. ची वाढ झाली तर २ रु. महामंडाळापेक्षा जास्त झाले ना.

**भरत शितोळे (मा. अतिरिक्त आयुक्त) :-**

ठिक आहे. आपल्याला पुढच्या मिटींगमध्ये सविस्तर माहिती देतो.

**बर्नड डिमेलो :-**

इतर परिवहन आणि इतर ट्रान्सपोर्टेशन जसे दर आकारतात त्या हिशोबाने एकामध्ये ४ रु. वाढवले आहेत.

**भरत शितोळे (मा. अतिरिक्त आयुक्त) :-**

बरेच वर्ष वाढ झालेली नव्हती.

**हेलन गोविंद :-**

साहेब, आम्ही मान्य करतो, एवढी वर्ष वाढ नाही झाली. पण निदान ४ रु. तरी नको. १५ रु. चौकचे ठेवले आणि उत्तनचे १३ रु. ठेवले तरी ठिक आहे. आम्हाला पण समजते, एवढी वर्ष आपल्याकडे वाढ झालेली नाही. प्रत्येक महानगरपालिकेमध्ये दरवर्षी वाढ होते आणि आपल्याकडे नाही झाली.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अपना, मुंबई, उल्हासनगर, ठाणा उधर कितना रेट है वह बताओ। कम्पेअर कैसे करेंगे?

**बर्नड डिमेलो :-**

ठाणे, टी.एम.टी. च्या दराप्रमाणे आपला जास्त झाला आहे. २ रु. वाढवायला पाहिजे होते. डायरेक्ट ४ रु. वाढलेत. एस.टी. महामंडळाची बस डायरेक्ट उत्तनवरुन भाईंदरला येते. तिथे १४ रु. घेते आणि आपले १६ रु. घेतात. आपले अगोदर १२ रु. होते. आणि त्यांचे १४ रु. होते. ठिक आहे. महामंडळाचे २ रु. जास्त होते. त्या हिशोबाने घ्या ना. इतर परिवहन चालवतात त्या हिशोबाने राहू द्या.

**भरत शितोळे (मा. अतिरिक्त आयुक्त) :-**

तुलनात्मक अभ्यास करुन सादर करतो.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. शितोळे साहेब, तो पर्यंत भाववाढ थांबवा. कारण लोकांमध्ये वातावरण बेकार होत आहे.

**भरत शितोळे (मा. अतिरिक्त आयुक्त) :-**

पुढच्या मिटींगमध्ये चर्चा करु. पूर्वी आपली फारच कमी होती. आता गर्व्हमेंटने जी दिलेली आहे तेवढी आपण घेतलेली नाही. आपण मध्य काढून केलेले आहे. पुढच्या वेळेस सविस्तर माहिती तुम्हाला देतो.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, हे विषय अदान प्रदान होतात. आपण आयुक्तांना पत्र दिले. २३ नंबरची बस चालते. ती सगळ्यांच्या सोयीची बस आहे. ती मधून जाते. त्या रुटवर कोणत्याही दुसऱ्या बसेस नाहीत. बेस्टच्या पण नाही. दुसत्या कोणत्या पण नाही. ती बस चालु केली, २ वेळा ३ वेळा चालु बंद, चालु बंद नंतर त्यांनी सांगितले की, ४ बस देतो आणि टाईम टेबल लावले. तीन बस चालतात तर मग प्रॉफीट कसे काय होणार? तुमच्याकडे बसच नाही. आम्ही पत्र दिले की, ह्या रुटवर बेस्टला बस चालवायची परवानगी पत्र द्या, विनंती करा की आमच्याकडे गाड्या नाहीत किंवा अपरिहार्य कारणास्तव हा रुट तुम्ही चालववा. साहेब सावंत साहेबांनी आयुक्तांच्या समोर विरोध केला. आपण उद्या बोलू चार गाड्या काकांना देवून टाकू या. चार नाही गाडी मिळत नाही. लोकांची सोय नाही. लोक आपल्या नावाने शिमगा करतात. आमची विनंती आहे की २३ नंबरचे रुटचे तुम्ही बेस्टला एक पत्र द्या. त्या रुटवर तुम्ही गाडी चालवा. ते १ नाही १० गाड्या टाकतील. कारण, त्या पॅसेन्जरला खात्री मिळते की, ही बस गेली तर दहा मिनिटानंतर दुसरी येते.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, आपण दोन मिटींग आधी नगररचनाचा विषय घेतला होता. आरक्षणाबाबत आढावा घेणे. आता काही दिवसांपूर्वी पेपरला न्यूज आलेली की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच नाट्यगृह आरक्षण रद्द झाल. तर मला अस वाटते कमिशनर साहेब की, संबंधित विभागाने निवेदन कराव परिस्थिती ॲक्जॅक्ट काय आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, मिरा भाईंदर शहराची विकास योजना ९७ मध्ये मंजुर झालेली आहे. आता सामंत साहेबांनी ड्रामा थिएटरचा विषय काढला आहे. तो आरक्षण क्र. २६२ आहे. तर आपल्या प्लानमध्ये ड्रामा थिएटरसाठी राखीव आहे. सदरच आरक्षण विकसित करण्या संदर्भात २००३, २००९ आणि २०११ या तिन्ही वेळेला मा. महासभेत विषय दिला होता. आपण आरक्षण विकसित करण्या संदर्भामध्ये तर तिन्ही वेळेस ह्या विषयाला नकार आला सभेकडून. दरम्यानच्या काळात आरमन डेव्हलपमेंटसाठी प्रस्ताव दिला होता. विकास नियंत्रण नुसार तरतुदी नुसार च्या आरक्षण विकसित करता येत नाही. म्हणून ३७ चा प्रस्ताव महासभेच्या मंजुरीने सर्व कार्यवाही करुन तो प्रस्ताव शासनाकडे सादर केला. परंतु त्याला शासनाकडूनही मंजुरी मिळालेली नाही. दरम्यानच्या काळात त्याला परचेस नोटिस दिली. डी.पी. ॲक्टच्या सेक्शन १२७ नुसार. जर परचेस नोटिसच्या नुसार हायकोर्टाच्या आदेशानुसार ते व्यपगत झालेले आहे. याबाबतचे नोटिफिकेशन शासनाने अद्याप पर्यंत काढलेले नाही. या हायकोर्टाच्या निर्णयाच्या विरोधात आपण सुप्रिम कोर्टामध्ये ही एस.एल.पी. फाईल देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

परचेस नोटिस दिल्यानंतर काय प्रोसेस असते.

**सत्यवान धनेगावे :-**

परचेस नोटिस दिल्यानंतर एक वर्षाच्या आत त्याच नोटिफिकेशन व्हायला पाहिजे.

**प्रमोद सामंत :-**

मग त्यासाठी आपण काय केल?

**सत्यवान धनेगावे :-**

त्यांनी परचेस नोटिस दिले अस आम्हाला हायकोर्टामध्ये केस दाखल केल्यानंतर परचेस नोटिस दिली अस आमच्या निदर्षनास आले.

**प्रमोद सामंत :-**

परचेस नोटिस तुमच्याकडे पोचली नाही. हायकोर्टात गेली.

**सत्यवान धनेगावे :-**

हो.

**प्रमोद सामंत :-**

आपल्याकडे आलेलीच नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

वर्कशीटला नोंद आहे. पण ते दिलेली नाही.

**प्रमोद सामंत :-**

हायकोर्टाच्या का?

**सत्यवान धनेगावे :-**

नाही. आमच्या ऑफिसची वर्कशीट जी असते त्यामध्ये दिलेली नोंद आहे. परंतु, ती परचेस नोटिस त्याचे कागदपत्र मालकी हक्काचे. त्यांनी हायकोर्टामध्ये पिटीशन फाईल केल्यानंतर निदर्शनास आले आहे.

**प्रमोद सामंत :-**

परचेस नोटिसची तुमच्या वर्कशीटला नोंद आहे. मग तुम्ही ती नोंद कधी बघितली?

**सत्यवान धनेगावे :-**

हायकोर्टाच्या पिटीशन नंतर तपासून घेतले आहे.

**प्रमोद सामंत :-**

वर्कशीटला असेल तर तुमच्याकडे पण आल असणार.

**सत्यवान धनेगावे :-**

नाही आल. याबाबत हायकोर्टामध्ये ॲफिडेंट फाईल केली आहे की, अशी-अशी परिस्थिती घडलेली आहे म्हणून.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, हा विषय असा आहे की, अशा प्रकारची आपल्याकडे बरीच आरक्षणे आहेत. ३००-३२५ जी काही आरक्षणे आहे ती त्यापैकी ४० टक्के आरक्षण सी.आर.झेड मध्ये आहे. आपण ती विकसित करुच शकत नाही. उरलेल्या ६० टक्के आरक्षापैकी आपण फक्त आतापर्यंत २० टक्के आरक्षण ताब्यात घेतली असतील. आणि त्याची प्रोसेस चालु आहे. बाकी आरक्षणाच अजुनही कोणतही प्रोसेस चालू नाही. मग असच होईल की, प्रत्येक जण परचेस मध्ये देईल. सहा महिन्याच्या आत तो कोर्टात जाईल. तसा नियमच आहे ना की, सहा महिने आपण कोणतीही कारवाई केली नाही की, ते आरक्षण आपल्याला परत द्याव लागेल. तर हा ज्यावेळी परचेस कोटीस येते त्यावेळी मला अस वाटते की, संबंधीत विभागाने स्टँडींग समोर किंवा मा. महासभेसमोर, किंवा मा. महापौर मॅडम यांना काहीतरी सुचना दिल्या पाहिजे. जेणेकरुन त्याचे प्रॉपर फॉलोअप होतील. अशाप्रकारे जवळ-जवळ ८० टक्के आरक्षण आपल्याकडे आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

परचेस नोटिसच्या बाबतीत यापुढे आम्ही काळजी घेऊ.

**प्रमोद सामंत :-**

या अगोदर पण घेतली पाहिजे होती. याला कोण जबाबदार आहे? वर्कशीटमध्ये नोंद होते. तर आपल्यासमोर गोष्ट का येत नाही? वर्कशीट कोण लिहित?

**सत्यवान धनेगावे :-**

क्लार्क लिहितो.

**प्रमोद सामंत :-**

क्लार्क कडून तुमच्याकडे का नाही आल? त्यावर काही कारवाई होणार का? ही क्लार्कची चूक आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

आम्ही हायकार्टात ॲफिडेवीट फाईल केलेली आहे.

**प्रमोद सामंत :-**

हा विषय मी समोर घ्यायला ह्यासाठी म्हटल की, एखाद महत्वाच आरक्षण रद्द होत. मिरा भाईंदरमध्ये नाट्यगृह नाही. मिरा भाईंदरमध्ये कुठे चांगल मैदान नाही. आपल्या इथे एम.एम.आर.डी.ए. चे जवळ-जवळ आमच्या बाजुलाच साडे चार हजार पजेशन आता देवू. त्याच्या बाजूला लोढाला पजेशन देणार आहोत. शांती गार्डन आमच्या येथे विकसित झाल, पुनम सागर झाल. तिथे एक कॉमन आर.जी. मुलांसाठी खेळण्यासाठी कॉमन मैदान. हा विषयच नाही. मी काल पूण्याला गेलो होतो. पूण्यामध्ये जवळ-जवळ आजूबाजूला चार स्टेडियम दिसतात. आता तिथे स्टेडियम असल्यामुळे स्पोर्टस् हा विषय आपोआप तयार होतो ना. जर तुमच्याकडे मैदानच

नसतील, नाट्यगृह नसेल तर तुमच्याकडे ती संस्कृती कधी येणारच नाही आणि हे जे नाट्यगृहाच आरक्षण आपल्याकडून गेलेल आहे ते आपल्यासाठी फार मोठे उदाहरण आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

गेले आहे. पण आपण अपिल केलेल आहे.

**प्रमोद सामंत :-**

अपिलात काय होणार आहे? अपिलात काही होत नाही. सुप्रिम कोर्टाचे तसे निर्देष आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

ही केस सुप्रिम कोर्टाचे डिसीजन नुसार निकाल आहे. त्यानुसार नाही. ह्या केसमध्ये त्याकेस मध्ये फरक आहे. ह्या केस मध्ये विकासक स्वतःहुन विकसित करण्यासाठी आपल्याकडे आला म्हणून महापालिकेने डी.सी. रुल मध्ये नियमात बदल करण्यासाठी ३७ चा प्रस्ताव केला त्याबाबतची हीअरींग घेतली.

**प्रमोद सामंत :-**

प्रशासनाने त्याबाबत काहीतरी लक्ष दिल पाहिजे होत. पाठपुरावा केला पाहिजे होता परचेस नोटिस आली.

**सत्यवान धनेगावे :-**

३७ ची कारवाईचा प्रस्ताव गर्व्हमेंटकडे गेला पाठपुरावा केला. पालकमंत्रीकडे बैठक झाली. नंतर अंतिम धोरण ठरवण्याचा प्रस्ताव मा. महासभेकडे गेला. ते धोरण पण मा. महासभेने रिजेक्ट केल.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, अशाच प्रकारे इतर आरक्षण आपल्या ताब्यातुन जाण्याची भिती या सभागृहाला आणि मला दिली अस वाटते. बाकी सभागृहाने आपला निर्णय सादर करेल.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही पुढाकार देतो. तुम्ही साथ द्या.

**प्रमोद सामंत :-**

प्रशासनाने आपल्या चूका सुधाराव्यात अस मला वाटते. म्हणून हा विषय मी येथे आणलेला आहे. आणि त्याबाबत केलेली कारवाई पुढच्या मिटींगला स्टँडिंगसमोर सविस्तर आणावी. विषय असो अथवा नसो. मागे, याच प्रकारचा विषय नगररचनाच्या आरक्षणावरुन घेतला होता. परत त्याच कोणीच काही दिलेल नाही.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, सन्मा. सदस्य प्रमोद सामंत यांनी जो विषय मांडला तो अतिशय महत्वाचा विषय आहे. गेल्या वेळेला पूर्व सुचना नगररचनेला न देता गोषवाऱ्यामध्ये आपण तो विषय घेतला होता. म्हणून आपण तो विषय पुढे ढकलला.

**प्रमोद सामंत :-**

संबंधित विभागाला आढावाचा विषय माहित होता. त्याबाबत त्यांनी त्याची माहिती आणली पाहिजे होती.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती साहेब, आपल्याला विनंती आहे की, पुढच्या मिटीगला आपण हा विषय रितसर घ्या.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. पूढच्या मिटींगमध्ये हा विषय घेण्यात येईल.

**राजेश वेतोसकर :-**

मा. सभापती साहेब, मला पण एका विषयावर चर्चा करायची आहे. श्वानपथक काय आहे ते आहे की नाही?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो, ॲनीमल वेलफेअर बोर्ड जे आहे. केंद्र शासनाच्या अखत्यारित पर्यावरण मंत्रालयाच्या त्यांची जी संस्था होती ॲनीमल वेलफेअर सोसायटी अंबरनाथची होती. जी येथे आणि कल्याणमध्ये काम बघत होती त्या संस्थेला डि-रेकग्नाईज केल आणि तस युनियनला पत्र प्राप्त झाल. त्यामुळे त्या संस्थेच कामकाज थांबवण्यात आल. आणि त्या संस्थेच कामकाज थांबवल्यावर जो कर्मचारी वर्ग होता तो संपूर्ण कर्मचारी वगैरे गाडी घेऊन ती व्यक्ती निघून गेलेली आहे. त्यामुळे आयुक्त महोदयांनी काल संध्याकाळी त्याबाबत मंजुरी दिल्याची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वसई-विरारला ज्यांनी रिसेंटी नोव्हेंबरमध्ये टेंडर झालेल होत. त्या अनुषंगाने त्यांनी ते काम पहाव. त्याच कार्यादेश आणि वर्कऑर्डर सोमवारपर्यंत करतो.

**राजेश वेतोसकर :-**

साहेब, गेल्या २-३ आठवड्यापासून मी साहेबांच्या पाठी लागलो आहे. माझ्या वॉर्डमध्ये अतिशय सडलेला कुत्रा आहे. ह्यांना बोललो एक कुत्रा उचलण्याची व्यवस्था करा. हे हातवर करुन मोकळे होतात. आमची जबाबदारी नाही हे नाही ते नाही.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

जबाबदारी अस मी म्हटल नाही. मी म्हटल की, कर्मचारी हे त्यांचे होते. महापालिकेने एकही कर्मचारी त्या विभागात दिला नव्हता. ठेका होता. चार वर्षांची निविदा होती.

**प्रविण पाटील :-**

साहेब हीच परिस्थिती आमच्याकडे आहे. गेले १५ दिवस झाले असाच कुत्रा आहे. सतरा वेळा सांगितल असेल. तरी ही तो कुत्रा अजुन तिथेच आहे.

**प्रमोद सामंत :-**

उपायुक्त साहेब, चार वर्षांची निविदा संपली ठेका संपला. तर आपल काम आहे ना दुसरा ठेका काढायचा.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

निविदा संपलेली नव्हती. निविदा आणखीन सुरुच आहे. परंतु संस्था डि-रेकग्नाईज न झाल्यामुळे आपल्याला ती संस्था ॲनीमल वेलफेअर बोर्डने डि-रेकग्नाईज केली.

**प्रविण पाटील :-**

साहेब, पर्यायी व्यवस्था करा.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

सोमवार पासून कारवाई सुरु होईल.

**राजेश वेतोसकर :-**

सोमवार पासून नाही आजच करुन घ्या.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आपल्याला त्याच्यासाठी जी हत्यारे लागतात ती सगळी ठेकेदार घेऊन गेला आहे.

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती साहेब, माझा शेवटचा प्रश्न आहे. वर्ष २००९-१०-११-१२-१३ या दोन वर्षाचा ऑडीट रिपोर्ट अजुन आपल्याकडे आलेला नाही. तर त्याबद्दल ऑडीटर साहेबांनी खुलासा करावा.

**भागवत मुरकुटे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो सन २०११-१२ च रिपोर्ट अंतिम टप्प्यात आहे. तो झाला की मी आपल्या समोर सादर करतो.

**प्रमोद सामंत :-**

पुढच्या मिटींगमध्ये रिपोर्ट आला पाहिजे.

**भागवत मुरकुटे :-**

कर्मचारी कमी असताना देखील आम्ही माहिती देतो.

**प्रमोद सामंत :-**

ऑडिटचा विषय, परिवहनचा विषय नगररचनेचा विषय. हे सगळे विषय पुढच्या मिटींगमध्ये घ्यायचा. पुढच्या मिटींगला आले पण पाहिजे. आणि त्यांनी हे दुसऱ्यांदा सभागृहात सांगितलेल आहे की, त्यांच्याकडे स्टाफ नाही आहे. तर त्यांना स्टाफ द्या ऑडिट विभाग आहे. स्टाफ नसेल तर कस काय ऑडिट करणार.

**प्रशांत दळवी :-**

मा. आयुक्त महोदय, आपण गेल्यावेळेच इतिवृत्तांत ह्यावेळेला कायम केलेल नाही. ते पुढच्या मिटींगला ठेवलेल आहे. माहिती ह्यासाठी देतो की, आपले विधी विभाग, टॅक्स विभाग, परिवहन विभाग हे २-३ अधिकारी आलेलेच नाही. आपण गेल्या मिटींगला बोलले होते की .................

**भरत शितोळे (मा. अतिरिक्त आयुक्त) :-**

परिवहनचे उपायुक्त ते कोर्टात गेले आहे.

**प्रशांत दळवी :-**

शिक्षण विभाग ही नाही, विधी विभाग ही नाही. त्यांना समज बजावले कोर्टाने मग, समज बजावेपर्यंत कोर्टात हजर का नाही झाले?

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही रोज उशिरा संध्याकाळी जाता. आपण लाईटचे पैसे देतो. वर्सोवा ब्रिज ते गायमुखच स्ट्रिट लाईटचे पैसे आपण देतो की नाही? तिथे लाईटच बंद आहे. तर त्याच आपण पेमेंट करतो की नाही? देतो तर कोणाला देतो आणि चालु करत तर कोण करते?

**शरद नानेगावकर :-**

बंद आहे त्याचे नाही देत.

**रोहिदास पाटील :-**

महापालिकेचे पैसे वाचवतो अस तुमच धोरण आहे की, लोकांना सेवा द्यायची नाही अस तुमच धोरण आहे. ते खांबे कशासाठी लावले.

**शरद नानेगावकर :-**

त्यांना सेवा द्यायची आहे. पण त्यांच प्रकरण कोर्टात आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला अस कोण बोलल नाही.

**प्रशांत दळवी :-**

अशा प्रकारचे तुम्ही पोलिस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल केला का?

**शरद नानेगावकर :-**

जे.सी.बी. वाल्यांनी मध्ये खोदकाम केल होत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आम्हाला सांगा. रेकॉर्डवर येऊ द्या. ह्या महिन्यात जे.सी.बी. वाल्यांनी लाईन तोडून काढली त्यांनी खांबे आडवे पाडले. मी काल ठाण्यावरुन उशिरा आलो. गायमुख पासून ते वर्सोवा पर्यंत ४ ते ५ खांबे चालु आहे बाकी सगळे बंद आहे.

**शरद नानेगावकर :-**

केबल लाईट डॅमेज झालेल आहे.

**रोहिदास पाटील :-**

कधी होईल ते सांगा. आज होईल की उद्या ते सांगा?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

तुम्ही संध्याकाळी पाहणी करा आणि तपासुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

उद्या संध्याकाळी सगळे लाईट चालू झाले पाहिजे. तुमचा फोन आला पाहिजे. काका लाईट सगळ्या चालू झाल्या. साहेब, आम्ही जीव तोडून का बोलतो ह्यातल्या सगळ्या अधिकाऱ्यांनी आम्हाला सांगाव सर्व्हिस रोड चालू झाला दोन वर्षापूर्वी फ्लाय ओव्हरजच्या बाजूला लाईट नव्हती १ कोटी २५ लाख रु. लाईट आपण आय.आर.बी. च्या छातीवर बसून लावून घेतली.

**प्रमोद सामंत :-**

विषय निघाला म्हणून मी सांगतो. आपण स्टँडिंगच्या पहिल्या मिटींगला रिलायन्सचे पोल विविध ठिकाणी लावण्याचा ठराव केला होता. आता पर्यंत त्यातल १० टक्के सुध्दा काम झालेल नाही. तर ते त्यांनी कराव. आणि का लागत नाही. का लावले नाही? त्यांना आपण ऑर्डर देत नाही का? ॲक्च्युअल ॲक्जॅक्ट काय डिल असते. कोण पैसे देतो कोण नाही देत? त्यांनी स्वतःने लावायचे आहे. त्याबद्दल संबंधित खात्याने निवेदन कराव.

**प्रकरण क्र. ९४ :-**

निविदांना मंजूरी देणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ८५ :-**

पाणी पुरवठा विभागामार्फत विविध विकासकामांकरिता निविदा मागविण्यांत आलेल्या असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**१) मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त २० द.ल.ली. पाणी पुरवठा योजने अंतर्गत खालील कामाच्या निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.**

अ) **कामाचे नांव :-** साकेत संकुल ठाणे येथे मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीवरुन पाणी घेणेकरीता पंपगृहात ४२५ एच.पी.क्षमतेचा व्ही.एफ.डी. प्रणालीवर आधारित इनलाईन बुस्टर पंपाचा पुरवठा करणे, बसविणे, कार्यान्वित करणे.

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराने सादर केलेला दर | वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | २,६६,०४,६००/- | ४.५ % जास्त | ३.९०% जास्त (रु.२,७६,४२,१७९) | 1st lowest |
| २ | मे. ग्रॅव्हीट इजिनिअरींग वर्कस् | | ९.० % जास्त | - | 2 nd lowest |
| ३ | मे. अे.के. इलेक्ट्रीकल ॲण्ड वर्कस्. | | ११.५% जास्त | - | 3rd lowest |

मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९०% जास्त दराची (रू.२,७६,४२,१७९/-) निविदा वाजवी आहे.

**ब) कामाचे नांव :-** गायमुख ते चेना दरम्यान १३५० मि.मी. व्यासाची मुद्‌पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.

या कामाची निविदा दै. नवाकाळ व दै. मिड-डे या वृत्तपत्रात दि. १०/०७/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती, निविदा ऑनलाईन भरण्याची मुदत दि. ०५/०८/२०१३ रोजी पर्यंत होती. सदर निविदा भरण्याची

मुदत तीन वेळा वाढवून अंतिम मुदत दि. १४/०८/२०१३ रोजी पर्यंत होती. या निविदेचा आर्थिक देकार दि.३०/०८/२०१३ रोजी उघडण्यात आला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे .

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराने सादर केलेला दर | वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्कायवे इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | १७,८०,५४,६७५/- | १४.८८% जास्त | | निविदाकारांने निविदा मागे घेतली |
| २ | देव इंजिनियर्स | | २३.१०% जास्त | १४.७० % जास्त (रु.२०,४२,२८,७१२) | 1st lowest |
| ३ | एस.बी. खकाळ | | ३५.००% जास्त | - | 2 nd lowest |
| ४ | सुरिंद्रा इंजिनिअरींग कं. लि. | | ५०.५५% जास्त | - | 3rd lowest |
| ५ | परपेक्ट इंजिनिअरींग असोसियटस् प्रायव्हेट लि. | | ६०.००% जास्त | - | 4th lowest |

वरीलपैकी मे. स्कायवे इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांनी त्यांची निविदा मागे घेतलेली असल्यामुळे त्यांच्या निविदेची इसारा रक्कम निविदेतील अटीशर्तीनुसार जप्त करण्यात येऊन मे. स्कायवे इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची निविदा रद्द करण्यात आली. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे बोलीदार मे. देव इंजिनियर्स यांना वाटाघाटी करणेकरिता बोलाविण्यात आले. वाटाघाटी अंती त्यांनी त्यांचे दर कमी केलेले असून कमी करण्यात आलेले दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्तीचे (रू.२०,४२,२८,७१२/-) आहेत.

मृदू पोलादी प्लेट व डांबराच्या दरामध्ये वाढ झालेली आहे. सदर निविदेमध्ये मृदू पोलादी पाईपसाठी लागणारे M.S.Plate व रस्ता पुर्नबांधणी करता लागणाऱ्या डांबराचा सदयाचा बाजारात असलेला दर सरकारी कंपनी भारत पेट्रोलिअम कॉपोरेशन लि. कडून मागविण्यात येऊन त्यानुसार सदर बाबीचे दर पृथ्थकरणात करण्यात आले आहे. सद्यस्थितीत बाजारात स्टील, सिमेंट व इतर बांधकाम साहित्याच्या दरात वाढ झालेली आहे. चालू दरसुची सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकातील उपरोक्त बाबींचे क़्च्ङ तयार केल्यापासून आजपर्यंत झालेली दरामधील वाढीचे दर पृथक्करण केले असता. सदर कामाचे अंदाजपत्रकीय किंमत रु. १९,७२,६९,७८८/- (निविदेतील अंदाजपत्रकीय किंमतीच्या १०.७९ % जादा दराने) येत आहे.

त्यामुळे मे. देव इंजिनियर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा वाजवी आहे.

**क) कामाचे नांव :-** <u>हटकेश ते शामराव विठ्ठल बँकेपर्यंत १०६७ मि.मी. व्यासाची मुदृपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.</u>

या कामाची निविदा दै. नवाकाळ व दै. मिड-डे या वृत्तपत्रात दि. १०/०७/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती, निविदा ऑनलाईन भरण्याची मुदत दि. ०५/०८/२०१३ रोजी होती. सदर निविदा भरण्याची मुदत तीन वेळा वाढवून अंतिम मुदत दि. १४/०८/२०१३ रोजी पर्यंत होती. सदर मुदतीत सहा निविदाकारांनी निविदा दाखल केल्या होत्या. त्यापैकी मे. एम.टी.फड व मे. श्री अनुकुल इन्डस्ट्रीज प्रा.लि. यांनी निविदा मागे घेतल्यामुळे त्यांच्या निविदेची इसारा रक्कम निविदेतील अटीशर्ती नुसार जप्त करण्यात येऊन उर्वरीत ४ निविदाकाराचे आर्थिक देकार दि.०५/०९/२०१३ रोजी उघडण्यात आले. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराने सादर केलेला दर | वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | एस.बी. खकाळ | ६,०३,६७,२१६/- | २९.००% जास्त | १४.७० % जास्त (रु.६,९२,४१,१९७) | 1st lowest |
| २ | देव इंजिनियर्स | | ३५.००% जास्त | - | 2 nd lowest |
| ३ | सुरिंद्रा इंजिनिअरींग कं. लि. | | ५०.५५% जास्त | - | 3rd lowest |
| ४ | परपेक्ट इंजिनिअरींग असोसियटस् प्रायव्हेट लि. | | ६०.००% जास्त | | 4th lowest |

मे. एस.बी. खकाळ यांचा देकार लघुत्तम असून त्यांना दर वाटाघाटी करणेकरिता बोलाविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचे दर कमी करुन वाटाघाटी अंतिम त्यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्त दराची (रू.६,९२,४१,१९७/-) आहे.

मृदू पोलादी प्लेट व डांबराच्या दरामध्ये वाढ झालेली आहे. सदर निविदेमध्ये मृदू पोलादी पाईपसाठी लागणारे M.S.Plate व रस्ता पुर्नबांधणी करता लागणाऱ्या डांबराचा सदयाचा बाजारात असलेला दर सरकारी कंपनी भारत पेट्रोलिअम कॉपोरेशन लि. कडून मागविण्यात येऊन त्यानुसार सदर बाबीचे दर पृथकरणात करण्यात आले आहे. सद्यस्थितीत बाजारात स्टील, सिमेंट व इतर बांधकाम साहित्याच्या दरात वाढ झालेली आहे. चालू दरसुची सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकातील उपरोक्त बाबींचे दर तयार केल्यापासून आजपर्यंत झालेली दरामधील वाढीचे दर पृथक्करण केले असता. सदर कामाचे अंदाजपत्रकीय किंमत रु. ६,६९,४८,९७५/- (निविदेतील अंदाजपत्रकीय किंमतीच्या १०.९० % जादा दराने) येत आहे.

मे. एस.बी. खकाळ यांचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा वाजवी आहे.

**२) ५० द.ल.ली. योजने अंतर्गत उर्वरित कामे.**

**ड) कामाचे नांव :-** ५० द.ल.ली. योजने अंतर्गत मिरा भाईंदर क्षेत्रात खालील ठिकाणी जलकुंभ, साठवण टाकी व एम.बी.आर. बांधणेचे संकल्पन व संकल्पचित्र तयार करणे, बांधणे व कार्यान्वित करणे. सुभाष मैदान सर्व्हे क्र. ७७७ येथे १ द.ल.ली. क्षमतेचा जलकुंभ बांधणे, डोंगरी येथे ०.९० द.ल.ली. क्षमतेची साठवण टाकी बांधणे व डोंगरी येथे ०.७६ द.ल.ली. क्षमतेचा एम.बी.आर. बांधणे.

**५० द.ल.ली. योजनेतील उर्वरित कामातंर्गत अपुर्ण राहिलेल्या कामाकरिता निविदा मागविण्यात आलेली होती. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराने सादर केलेला दर | वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | संदेश डी. बुटाला | २,४१,९५,८००/- | २२.५०% जास्त | १३.८६ % जास्त (रु.२,७५,४९,३३८) | 1st lowest |
| २ | मे. एस.बी. खकाळ | | २३.४०% जास्त | - | 2 nd lowest |
| ३ | मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि | | २५.००% जास्त | - | 3rd lowest |

सदर अंदाजपत्रकातील दर हे सन २०११-१२ च्या दरसुचीवरती आहेत. सद्यस्थितीत बाजारात स्टील, सिमेंट व इतर बांधकाम साहित्याच्या दरात वाढ झालेली आहे. त्यामुळे संदेश डी. बुटाला यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८६% जास्त (रू.२,७५,४९,३३८/-) दराची निविदा वाजवी आहे.

अनुक्रमांक. **अ) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९०% जास्त दराची (रू.२,७६,४२,१७९/-) आहे. अनुक्रमांक **ब) देव इंजिनियर्स** यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्त दराची (रू.२०,४२,२८,७१२/-) आहे व अनुक्रमांक **क) एस.बी. खकाळ** यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्त दराची (रू.६,९२,४१,१९७/-) आहे.अनुक्रमांक **ड) संदेश डी. बुटाला** यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८६% जास्त दराची (रू.२,७५,४९,३३८/-) आहे. यांचे निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९५, लालमाती, शेणखत, सफेद रेती पुरवठा कामी वार्षिक निविदेस मंजूरी मिळणेबाबत (उद्यान विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, दुभाजक व रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करणेकरिता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामी मा. आयुक्त सो. यांनी दि.१६/०५/२०१३ रोजी वृक्ष प्राधिकरण समिती सभेसमोर ठेवणेकरीता मंजूरी देण्यात आली होती. त्यानुसार वृक्ष प्राधिकरण समिती सभा दि.२३/०५/२०१३, प्रकरण क्र.९, ठराव क्र.९ अन्वये निविदा मागविणेबाबत मान्यता दिल्यानुसार दि.१४/०६/२०१३ रोजी दै. जागरुक टाइम्स व दै. लोकसत्ता या वृत्तपत्रांत e-Tendering प्रणालीद्वारे जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेची मुदत दि.२४/०६/२०१३ पर्यंत होती व त्यात फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे कमीत कमी ३ निविदा प्राप्त होण्याच्या दृष्टिकोनातून सदर निविदेस दि.२७/०६/२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असता ३ निविदा प्राप्त झाल्या. तथापि सदर निविदेतील २ निविदाकार हे अटी-शर्तींची पूर्तता करीत नसल्यान याबाबत फेरनिविदा मागविण्यास दि.२३/०७/२०१३ रोजी मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिली. त्यानुसार दि.२७/०७/२०१३ रोजी दै. सुरज प्रकाश व दै. यशोभूमी या वृत्तपत्रांत e-Tendering प्रणालीद्वारे जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्याची मुदत दि.०६/०८/२०१३ पर्यंत होती व त्यामध्ये एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

**१) ओमकार इंजिनिअर्स ॲन्ड कंन्स्ट्रक्शन**

**२) हिरावती एन्टप्राईजेस**

**३) मे. भुषण ट्रान्सपोर्ट**

वरील प्राप्त एकुण तीनही निविदा विहित मुदतीत व तांत्रीक दृष्टया अर्हता प्राप्त करीत असुन सदर निविदांची Financial Bid उघडणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी दि. ११/०९/२०१३ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार दि.१२/०९/२०१३ रोजी सदर निविदेची Financial Bid उघडण्यात आली असून त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **मे.ओमकार इंजि. ॲन्ड कंन्स्ट्र.** | **मे.हिरावती इंन्टप्राईजेस** | **मे.भुषण ट्रान्सपोर्ट** |
|---|---|---|---|---|
| . | लालमाती | **रु.१३२३/- प्र.ब्रास** | रु.१७१७/- प्र.ब्रास | रु.२३८५/-प्र.ब्रास |
| . | शेणखत | **रु.१३२३/- प्र.ब्रास** | रु.१५९७/-प्र.ब्रास | रु.१८४५/-प्र.ब्रास |
| . | सफेदरेती | **रु.३४५०/- प्र.ब्रास** | रु.३९७७/-प्र.ब्रास | रु.१३५००/-प्र.ब्रास |

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणे या लेखाशिर्षाखाली रु.५०.०० लाख तरतुद करण्यात आली आहे. मे. ओमकार इंजि. ॲण्ड कन्स्ट्र. हे निविदेतील कमी दर सादर केलेले (L1) निविदाकार असून त्यांनी निविदेमध्ये सादर केलेले दर हे डी.एस.आर. (DSR) पेक्षा खुपच कमी असल्याने, ते निविदेत सादर केलेल्या दरानुसार पुरवठा करण्याची शक्यता कमी असल्याने त्यांचेकडून निविदेतील दर व डी.एस.आर. (DSR) मधील फरकाची रक्कम (एकूण निविदेच्या रकमेच्या प्रमाणात) अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम म्हणून महानगरपालिका फंडात (७ दिवसांच्या आंत) निविदाकाराने (L1) जमा करावी. निविदाकाराने (L1) अतिरिक्त सुरक्षा अनामत रकमेचा भरणा महानगरपालिका फंडात उक्त नमुद कालावधीत न केल्यास **मे. ओमकार इंजि. ॲण्ड कन्स्ट्र. (L1)** यांच्या ऐवजी **हिरावती एन्टप्राईजेस** (L2) यांचेसोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यात यावा.

तरी उपरोक्त सादर प्रमाणे लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामी आलेल्या ''**मे.ओमकार इंजिनिअर ॲन्ड कंन्स्ट्रक्शन**'' यांचे कमी दराच्या निविदा स्विकारणेंस **मा. आयुक्त सो.** यांनी दि.२१/०९/२०१३ रोजी मंजूरी दिलेली असुन सदर वार्षिक निविदेस व त्या कामी येणाया खर्चास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**राजेंद्र जैन :-**

इसमें पिछली बार का रेट क्या था वह जरा हमको बताइए।

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो मागच्या वर्षीचे जे दर होते ते भुषण ट्रान्सपोर्टरचे लालमातीचे १५७५ होते. शेणखतासाठी १३६० व सफेद रेतीसाठी ९५०० रु. असे दर होते.

**राजेंद्र जैन :-**

९५०० पिछले साल औरइस साल सफेद रेतीका ३४५० इतना बडा अंतर एक सालमे कैसा हो सकता है?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

ई-टेंडरींगमध्ये प्राप्त झाल आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

बराबर है। लेकिन में यह बोलना चाहता हुँ की, ई-टेंडरींग में अगर कोई सिंडीकेट बनता है और बहुत ज्यादा रेट जाता है तो अधिकारी लोग ध्यान क्यों नही कर पाते? साहब इसमें तीन गुना अंतर गया है। नगरपालिका को पैसा कौन देती है? जनता ही देती है ना टॅक्स भरके। नगरपालिका खुद रेट नही करती है। साहब, पिछली बार यह ९००० का था, इसबार सफेद रेती का रेट ३४५० है। ई-टेंडरींग में इतना फरक कैसे पड सकता है। डी.एस.आय. अगर छोटी है तो इतना फरक नहीं पडना चाहिए था। और दुसरी बात यह है की, नाले का हम सफाई काम करते है। हम कंट्रोल करते है। ऐसे ही यह भी ध्यान में आया की, कितनी बार डाला गया। उसकी गिनती पर कंट्रोल वही होता है। उसके लिए कुछ प्रोव्हिजन बजाइए। ४० ट्रक गए की १०० ट्रक गए।

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो जेव्हा ट्रक येतो लालमाती शेणखताचा तेव्हा लाल माती येते त्यावेळेस त्यांची रॉयल्टी ची मुळ प्रत आपण घेतो. त्या ट्रकचा नंबर, त्याचा वेळ, कालावधी, दिनांक, तारीख सगळे नमुद करण्यात येते. त्याच रजिस्टर मेन्टेन करतो. जेव्हा त्याच देयक अदा करतो त्यावेळेस सुध्दा मुळ हस्तीमध्ये त्यांच्या रॉयल्टीची बिल लावण्यात येतात.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९५ :-**

लालमाती, शेणखत, सफेद रेती पुरवठा कामी वार्षिक निविदेस मंजूरी मिळणेबाबत (उद्यान विभाग)

**ठराव क्र. ८५अ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, दुभाजक व रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करणेकरिता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामी मा. आयुक्त सो. यांनी दि.१६/०५/२०१३ रोजी वृक्ष प्राधिकरण समिती सभेसमोर ठेवणेकरीता मंजूरी देण्यात आली होती. त्यानुसार वृक्ष प्राधिकरण समिती सभा दि.२३/०५/२०१३, प्रकरण क्र.९, ठराव क्र.९ अन्वये निविदा मागविणेबाबत मान्यता दिल्यानुसार दि.१४/०६/२०१३ रोजी दै. जागरुक टाइम्स व दै. लोकसत्ता या वृत्तपत्रांत e-Tendering प्रणालीद्वारे जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेची मुदत दि.२४/०६/२०१३ पर्यंत होती व त्यात फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे कमीत कमी ३ निविदा प्राप्त होण्याच्या दृष्टिकोनातून सदर निविदेस दि.२७/०६/२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असता ३ निविदा प्राप्त झाल्या. तथापि सदर निविदेतील २ निविदाकार हे अटी-शर्तीची पूर्तता करीत नसल्यान याबाबत फेरनिविदा मागविण्यास दि.२३/०७/२०१३ रोजी मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिली. त्यानुसार दि.२७/०७/२०१३ रोजी दै. सुरज प्रकाश व दै. यशोभूमी या वृत्तपत्रांत e-Tendering प्रणालीद्वारे जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्याची मुदत दि.०६/०८/२०१३ पर्यंत होती व त्यामध्ये एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

**१) ओमकार इंजिनिअर्स ॲन्ड कंन्स्ट्रक्शन**

**२) हिरावती एन्टप्राईजेस**

**३) मे. भुषण ट्रान्सपोर्ट**

वरील प्राप्त एकुण तीनही निविदा विहित मुदतीत व तांत्रीक दृष्टया अर्हता प्राप्त करीत असुन सदर निविदांची Financial Bid उघडणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी दि. ११/०९/२०१३ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार दि.१२/०९/२०१३ रोजी सदर निविदेची Financial Bid उघडण्यात आली असून त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **मे.ओमकार इंजि. ॲन्ड कंन्स्ट्र.** | **मे.हिरावती इंन्टप्राईजेस** | **मे.भुषण ट्रान्सपोर्ट** |
|---|---|---|---|---|
| . | लालमाती | **रु.१३२३/- प्र.ब्रास** | रु.१७१७/- प्र.ब्रास | रु.२३८५/-प्र.ब्रास |
| . | शेणखत | **रु.१३२३/- प्र.ब्रास** | रु.१५९७/-प्र.ब्रास | रु.१८४५/-प्र.ब्रास |
| . | सफेदरेती | **रु.३४५०/- प्र.ब्रास** | रु.३९७७/-प्र.ब्रास | रु.१३५००/-प्र.ब्रास |

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणे या लेखाशिर्षाखाली रु.५०.०० लाख तरतुद करण्यात आली आहे. मे. ओमकार इंजि. ॲण्ड कन्स्ट्र. हे निविदेतील कमी दर सादर केलेले (L1) निविदाकार असून त्यांनी निविदेमध्ये सादर केलेले दर हे डी.एस.आर. (DSR) पेक्षा खुपच कमी असल्याने, ते निविदेत सादर केलेल्या दरानुसार पुरवठा करण्याची शक्यता कमी असल्याने त्यांचेकडून निविदेतील दर व डी.एस.आर. (DSR) मधील फरकाची रक्कम (एकूण निविदेच्या रकमेच्या प्रमाणात) अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम म्हणून महानगरपालिका फंडात (७ दिवसांच्या आंत) निविदाकाराने (L1) जमा करावी.

निविदाकाराने (L1) अतिरिक्त सुरक्षा अनामत रकमेचा भरणा महानगरपालिका फंडात उक्त नमुद कालावधीत न केल्यास **मे. ओमकार इंजि. ॲण्ड कन्स्ट्र. (L1)** यांच्या ऐवजी **हिरावती एन्टप्राईजेस** (L2) यांचेसोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यात यावा.

तरी उपरोक्त सादर प्रमाणे लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामी आलेल्या **''मे.ओमकार इंजिनिअर ॲन्ड कंन्स्ट्रक्शन''** यांचे कमी दराच्या निविदा स्विकारणेंस **मा. आयुक्त साो.** यांनी दि.२१/०९/२०१३ रोजी मंजूरी दिलेली असुन सदर वार्षिक निविदेस व त्या कामी येणाया खर्चास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९६, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग) प्रकरण क्र. ९७, मा. आयुक्त यांनी शिफारस केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (वाचनालय विभाग)

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९६ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ८६ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रू.) | कंत्राटदाराचे नाव | प्राप्त झालेले दर |
|---|---|---|---|---|
| १. | मिरारोड (पुर्व) आयडीयल पार्क रोड वरील राज एन्क्लेव्ह ते ग्रॅन्ड मनोर पर्यंत नगरोत्थान मिशनअंतर्गत नाल्यात येणारी जलवाहिनी स्थलांतरीत करणे | ९,४६,०००/- | मे. देव इंजिनिअर्स | अंदाजपत्रक दराने |
| २. | भाईंदर (प.) बाबासाहेब आंबेडकर नगर येथे राधा सत्संग रोड ते गल्ली बी क्र. १ व ४ येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | ८,७६,३००/- | मे. सुंदेशा एंटरप्राईजेस | ४.५०% कमी दराने |
| ३. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विंधन विहीरी (Borewell) ची वार्षिक देखभाल/ दुरूस्ती करणे | ८,७६,१००/- | मे. आबाजी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रक दराने |
| ४. | भाईंदर (पुर्व) एम.टी.एम. रोडवरील, एम.आय. उद्योग नगर येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | ६,६३,३००/- | मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दराने |
| ५. | मिरारोड (पुर्व) शांती नगर सेक्टर ३ येथे इमारत क्र. अे-४२ ते अे-६० पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | ६,५७,७००/- | मे. विंध्या ट्रेडर्स | २.००% जास्त दराने |
| ६. | मिरारोड (पुर्व) शांती नगर सेक्टर ९ येथे इमारत क्र. बी-१२ ते बी-८४ पर्यंत बिडाची जलवाहीनी पुरविणे व अंथरणे | १०,५९,४००/- | मे. विंध्या ट्रेडर्स | २.००% जास्त दराने |
| ७. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात काशी येथे जनता नगर पंपिंग ते मांडवी पाडा जंक्शन पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | १२,०८,६००/- | मे. विंध्या ट्रेडर्स | ५.९९% कमी दराने |
| ८. | भाईंदर (प.) येथे टेंभा रोडवरील सिद्धीविनायक गार्डन ते भाईंदर सेकंडरी स्कूल कडे जाणा-या रस्त्यावर बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | ५,१४,७००/- | मे. मानस कन्स्ट्रक्शन | ५.५०% कमी दराने |
| ९. | मिरा-भाईंदर मनपा क्षेत्रातील भाईदर प. येथील नेहरू नगर येथील माछी स्टोअर ते नेहरू नगर शेवटच्या टोकापर्यंत येणा-या गल्ल्यांमध्ये बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | ८,७०,०००/- | मे. मानस कन्स्ट्रक्शन | ५.३५% कमी दराने |

वरील मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ९७ :-**

मा. आयुक्त यांनी शिफारस केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (वाचनालय विभाग)

**ठराव क्र. ८७ :-**

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वाचनालयांकरीता ग्रंथ खरेदी करणेकामी वार्षिक निविदेस मंजुरी मिळणेबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वाचनालयांकरिता ग्रंथ खरेदी करणे मा. आयुक्त सो. यांच्या दि. ०७/०६/२०१३ रोजीच्या मान्यतेने (निविदा प्रसिध्दीस) दि. २७/०६/२०१३ रोजी दै. सामना व दै. आफ्टरनून तसेच e-Tendering प्रणालीव्दारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेची मुदत दि. ०६/०७/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत होती. परंतु सदर कालावधीत एकच निविदा प्राप्त झाली होती. कमीत कमी तीन निविदा प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून सदर निविदेस दि. १०/०७/२०१३ रोजीपर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतीत एकच निविदा प्राप्त असल्याने पुन्हा दि. १६/०७/२०१३ पर्यंत व्दितीय मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार सदर कालावधीत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या.

**१) मे. प्रेयस कार्पोरेशन**

**२) मे. श्री ए.डी. इंटरप्रायजेस**

वरीलप्रमाणे प्राप्त एकुण दोन्ही निविदा विहित मुदतीत व तांत्रिक दृष्ट्या तपासण्यात आल्यानंतर सदर निविदेची Financial Bid उघडणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी दि. २९/०७/२०१३ रोजी मंजुरी दिलेली होती. त्यानुसार दि. ०१/०८/२०१३ रोजी सदर निविदेची Financial Bid उघडण्यात आली व त्यांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **तपशील** | **मे. प्रेयस कार्पोरेशन** | **मे. श्री ए.डी. इंटरप्रायजेस** |
|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वाचनालयांकरिता मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती व उर्दू भाषेतील ग्रंथ पुरवठा करणे. | ग्रंथाच्या छापील किंमतीवर **११% सुट** | ग्रंथाच्या छापील किंमतीवर **५.५% सुट** |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ''**मे. प्रेयस कार्पोरेशन**'' यांची निविदेतील ग्रंथाच्या छापील किंमतीवर दिलेली सुट सर्वात जास्त आहे. तरी उपरोक्त प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वाचनालयांकरिता ग्रंथ खरेदी करणेकामी आलेल्या निविदांमधून ग्रंथाच्या छापील किंमतीवर जास्त सुट देण्यात येणारी ''**मे. प्रेयस कार्पोरेशन**'' यांची निविदा स्विकारणेस मा.आयुक्त सो., यांनी दि.०१/०८/२०१३ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्याअन्वये सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार वरील प्रस्तावाचे अवलोकन करुन ही स्थायी समिती सदर निविदेस मंजुरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दुपारी १.०० वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**